रायगड, नवी मुंबई
वर्ष १८ ◆ अंक १६
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार २ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

म्हसळ्यात नातवाने केला आजोबाचा खून/२
माणगावमध्ये स्कुटी पेटून झाली भस्मसात/५
खालिद जामिल भारतीय फुटबॉल संघाचे नवे कोच/८

## लाडक्या बहिणींना रक्षाबंधनच्या पूर्वसंध्येला मिळणार निधी



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या मार्गदर्शनाने लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना रक्षाबंधनच्या पूर्वसंध्येला जुलै महिन्याचा सन्मान निधी (१५०० रुपये) वितरित करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दिली. या योजनेतून पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात, तर पीएम किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना दरमहा ५०० रुपये दिले जातात. जुलै महिन्याच्या हप्त्याचे वितरण करण्यासाठी २९८४ कोटी रुपये वर्ग करण्यात आल्याची माहिती शासन निर्णयात देण्यात आली आहे. जुलै महिन्याची म्हणजेच योजना सुरू झाल्यापासून १३व्या हप्त्याची रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात जमा होणार आहे.

# पनवेलमध्ये आज महारोजगार मेळावा; बेरोजगार युवकांना सुवर्णसंधी!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युवकांच्या समस्यांची जाण असलेले कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.२) सकाळी ९ वाजता खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात महारोजगार मेळावा २०२५ होणार आहे. भारतीय जनता पक्ष पनवेल, चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय अंतर्गत प्लेसमेंट सेल आणि इंटरनल क्वालिटी अशुरन्स यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



या महारोजगार मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे असून विविध क्षेत्रातील नामांकित व प्रतिष्ठित अशा जवळपास ४० कंपन्या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. रोजगाराच्या शोधात असलेल्या युवकांना या माध्यमातून प्रत्यक्ष नोकरीसाठी निवड होण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, पदविका, पदवीधर, पदव्युत्तर पदवीप्राप्त तसेच अकुशल उमेदवारही सहभागी होऊ शकतात. कंपन्यांच्या निरनिराळ्या विभागांमध्ये भरतीसाठी विविध प्रकारच्या पात्रता आणि क्षमतांनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हजारो रिक्त पदांवर या मेळाव्यात भरती होणार आहे.

मेळाव्याद्वारे परिसरातील बेरोजगार युवकांना स्थानिक पातळीवरच रोजगार मिळवण्याची संधी निर्माण होत असून उद्योग आणि रोजगार यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने राबवले जात आहेत. त्याच अनुषंगाने यंदाही महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

# स्वराज्याचे सुराज्य करण्याची जबाबदारी आपली

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन



### लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान

**पुणे : प्रतिनिधी**

लोकमान्य टिळक हे आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्रोत आहेत. त्यांचे व्यक्तित्व, कर्तृत्व आणि नेतृत्व हे व्यासंगी होते. त्यांच्या नावाने असलेला प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्याने माझे मोठेपण वाढले आणि जबाबदारीही वाढली आहे. लोकमान्य टिळकांनी आपल्याला स्वराज्य मिळवून दिले आहे. या स्वराज्याचे सुराज्य करण्याची जबाबदारी आपली आहे. याच प्रेरणेतून उर्वरित आयुष्यात समाजासाठी, देशासाठी शक्य ते सर्व करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेन, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवारी (दि. १) येथे केले.

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टतर्फे दरवर्षी १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या नावाने राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला जातो. यंदा हा पुरस्कार केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांना देऊन सन्मानित करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, माजी केंद्रीय मंत्री व माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, मंत्री चंद्रकांत पाटील, लोकमान्य टिळक स्मारक समितीचे अध्यक्ष रोहित टिळक, समितीचे विश्वस्तगण यांची प्रमुख उपस्थिती होती.

केंद्रीय मंत्री गडकरी पुढे म्हणाले की, स्वराज्यातून सुराज्याचा मूलमंत्र देशाला देणारे द्रष्टे समाजसुधारक, थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य टिळक यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या मानाच्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित होणे ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. या पुरस्कारासाठी टिळक स्मारक समिती व टिळक परिवार यांचे मनापासून आभार. या वेळी त्यांनी पुणे ते मुंबई हे अंतर केवळ दीड तासात पूर्ण करणे शक्य असल्याचे सांगितले.

लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराची परंपरा अधोरेखित करणारे आणि आजवर ज्या मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, अशा सर्वांची माहिती व महती विशद करणाऱ्या पुस्तकाचे या वेळी लोकार्पण करण्यात आले.

## आक्षेपार्ह स्टेटसमुळे यवतमध्ये तणाव

**पुणे : प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील यवत गावात एका तरुणाने पुजाऱ्याविषयी ठेवलेल्या आक्षेपार्ह व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसमुळे शुक्रवारी (दि.१) सकाळपासून तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या स्टेटसमुळे दोन समाजात गैरसमज पसरला आणि दोन्ही गट आमनेसामने आले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य बळाचा वापर करावा लागला. दरम्यान, संबंधित तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तणावाची माहिती घेतली असून प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, सध्या यवतमध्ये परिस्थिती नियंत्रणात आहे. सोशल मीडियावर अशा प्रकारे स्टेटस ठेवून कोणीही दोन समाजात तणाव निर्माण करू नये. सर्वांनी शांतता ठेवली पाहिजे. कोणीही कायदा हातात घेऊ नये. पोलीस यावर योग्य कारवाई करतील.

# कॉ. भूषण पाटील लोकांच्या सेवेसाठी काम करणारे नेते -लोकनेते रामशेठ ठाकूर

### सेवानिवृत्तीनिमित्त नागरी गौरव; सर्वपक्षीयांची उपस्थिती



**उरण : रामप्रहर वृत्त**

समाजाचे काम करण्यासाठी कधीही मागे न हटणार नाही याची खात्री असलेले नेते म्हणजे कॉम्रेड भूषण पाटील. त्यांची आणि माजी मैत्री ही कोणत्याही पक्षावर अवलंबून नव्हती, कारण ते सर्वांसाठी तळमळीने काम करतात. लोकांच्या सेवेसाठी काम करणारे नेते म्हणून ते कायम राहणार आहेत, असे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या नागरी गौरव सोहळ्यात काढले.

कामगार नेते आणि जेएनपीटीचे माजी विश्वस्त कॉ. भूषण पाटील यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त गुरुवारी (दि. ३१) जेएनपीटी टाऊनशीप येथील मल्टीपर्पज हॉलमध्ये भव्य नागरी गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते. त्यांनी कॉ. पाटील यांच्या कार्याचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

माजी आयआरएस अधिकारी सुधाकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला माजी आमदार जयंत पाटील, मनोहर भोईर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, जेएनपीटीचे विश्वस्त दिनेश पाटील, रवि पाटील, कम्युनिस्ट पक्षाचे नेते डॉ. डी.एल. कराड, कॉ. टी. नरेंद्र राव, सीमा घरत आदी उपस्थित होते. (पान २ वर..)



## काशीद समुद्र किनारी आढळले ५५ लाखांचे ड्रग्ज

### पोलिसांनी केले जप्त

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काशीद समुद्र किनाऱ्यावर एका प्लास्टिकच्या गोणीमध्ये चरससदृश्य अमली पदार्थ आढळला असून तो पोलिसांनी जप्त केला आहे. या ११ किलो १४८ ग्रॅम ड्रग्जची किंमत ५५ लाख ७४ हजार रुपये इतकी आहे.

काशीद समुद्रकिनारी संशयास्पद प्लास्टिक गोणी असल्याची माहिती मिळाल्यावर मुरूड पोलीस ठाण्याच्या पथकाने तेथे जाऊन तपासणी केली. या वेळी त्या गोणीमध्ये चरससदृश्य अमली पदार्थ आढळला. पोलिसांनी तो ताब्यात घेतला तसेच किनाऱ्यासह परिसरात पाहणी केली. त्यामुळे या भागाला काही काळ पोलीस छावणीचे स्वरूप आले होते.

या ड्रग्जप्रकरणी अज्ञाताविरोधात मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, याबाबची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी (अलिबाग) प्रतीक्षा खेतमाळी यांनी घटनास्थळी पोहचून आढळलेले ड्रग्ज जप्त करून सीलबंद करण्यात आले.

पोलीस अधीक्षकपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर आंचल दलाल यांनी जिल्ह्यात अमली पदार्थ तस्करीविरोधात झिरो टॉलरन्स मोहीम उघडली आहे. त्यानुसार या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार आज माणगावमध्ये



**माणगाव : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि. २) माणगाव येथे माजी आमदार स्व. अशोक साबळे यांचे पुत्र, शिवसेना नेते अ‍ॅड. राजीव साबळे आणि अलिबागचे माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर यांचे पुत्र, काँग्रेस नेते अ‍ॅड. प्रवीण ठाकूर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत.

या वेळी उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंगचे नामकरण व उद्घाटन सोहळा सकाळी १० वा. होणार आहे. यानंतर मातोश्री गंगुबाई शिंदे सीबीएससी स्कूल येथे जाहीर सभा होईल. या कार्यक्रम व सभेस राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राज्याचे उच्च शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.






# ‘महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांनी लोकाभिमुख काम करणे आवश्यक’



**रायगड : रामप्रहर वृत**

महसूल विभाग हा शासनाचा कणा असून महसूल विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी लोकाभिमुख काम करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज येथे केले. जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियोजन भवन हॉल येथे आयोजित महसूल दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, उप वनसंरक्षक अलिबाग राहुल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के आदि उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, महसूल विभाग हा शासनचा कणा असल्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली भूमिका कणखरपणे मांडून लोकाभिमुख काम करुन लोकांच्या जवळ जाणे अत्यंत महत्वाचे आहे. शासनाचे नवनवीन उपक्रम येत असून हे उपक्रम योग्यरितीने राबविण्यासाठी प्रत्येकाने आपले कर्तव्य व जबाबदारी म्हणून काम केले पाहिजे.

रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले म्हणाले की, शासन हे गोरगरीब जनतेचे आहे. त्यामुळे गोरगरीब जनतेला ज्या बाबी आवश्यक आहे ते देणे आपले कर्तव्य आहे ही भावना प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मनाशी ठेवून काम केले पाहिजे. याकरिता सर्वांनी लोकांच्या हितासाठी काम करावे अशा सूचना त्यांनी अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या. महसूल विभागाने हाती घेतलेली कामे अशीच पुढे सुरु ठेवावीत. नागरिकांना आवश्यक असलेले दाखले, इतर दाखले देण्याचे काम अधिकारी, कर्मचाऱ्यांनी वेळेत करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविकात जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, महसूल विभागामार्फत दि. १ ऑगस्ट पासून ते दि.७ ऑगस्टपर्यंत ‘महसूल सप्ताह’ साजरा करण्यात येणार आहे. या कालावधीत प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबरोबरच विविध योजनांचे लाभ देण्यात येणार आहेत. शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धींगत व्हावा, यासाठी विशेष मोहिम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने यावर्षी महसूल दिनाबरोबरच दि.१ ऑगस्ट पासून ते दि.७ ऑगस्टपर्यंत या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.यावेळी मंत्री महोदयांच्या हस्ते महसूल विभागातील उत्कृष्ट कर्मचार्यांचा सत्कार करण्यात आला.

# नागरी समस्यांवर प्रशासनाने तोडगा काढावा

## नागोठण्यातील आमसभेत आमदार रविशेठ पाटील यांचे निर्देश

**नागोठणे : बातमीदार**

नागोठण्यातील नागरिकांच्या विविध समस्यांसाठी पेण सुधागड मतदार संघांचे कार्यतत्पर आमदार रविशेठ पाटील यांनी गुरुवारी आयोजिलेली आमसभा ऐतिहासिक झाली. या आमसभेत विविध समस्यांवर आमदार रविशेठ पाटील यांनी योग्य तो तोडगा काढा असा आदेश संबंधित अधिकारींना दिला.



राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरण व वीज समस्यांबाबत नागरिक भयंकर आक्रमक झालेले दिसून आले. तसेच नागोठणेकर नागरिकांनी स्मार्ट मिटरबाबत नाराजी व्यक्त करून स्मार्ट मिटर आम्ही लावू देणार नाहीत अशी आक्रमक भूमिका घेऊन वीज वितरण कंपनीच्या अधिकारींना धारेवर धरले. दरम्यान आमदार रविशेठ पाटील यांनी जवळजवळ तीन ते चार तास नागरिकांच्या समस्या शांतपूर्वक ऐकून घेऊन त्या सोडविण्यासाठी मी कटीबद्ध असल्याचे सांगितल्यमुळे नागोठणेकर नागरिक बेहद खुश झाले.

आमदार रविशेठ पाटील यांनी नागोठणेकर नागरिकांचे मने जिंकली. दरम्यान रोहा नागोठणे रस्ता काँक्रीटीकरणाबाबत प्रस्ताव तयार असून लवकरच मंजुरी मिळून रस्ता तयार होणार आहे तसेच गणपती पूर्वी महामार्ग कसा सुस्थितीत होईल यासाठी बांधकाम मंत्र्यांसमवेत दौरा करणार असल्याची माहिती यावेळी आ.रविशेठ पाटील यांनी दिली.

आमदार रविशेठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या आढावा बैठकीत शिवसेना नेते किशोरशेठ जैन, राष्ट्रवादीचे नेते नरेंद्रशेठ जैन, डॉ. मिलिंद धात्रक, सरपंच सुप्रिया महाडिक, उपसरपंच अकलाख पानसरे, राष्ट्रवादीचे नेते सदानंद गायकर, विलास चौलकर, मधुकर ठमके, भाजप नेते मारुती देवरे, सोपान जांबेकर, किशोर म्हात्रे, भाजप रोहा ता. अध्यक्ष महेश ठाकूर, रोहा प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, रोहा तहसीलदार किशोर देशमुख, रोहा गटविकास अधिकारी शुभदा पाटील, पाणीपुरवठा अधिकारी युवराज गांगुर्डे, सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी विजय बागुल, कृषी अधिकारी महादेव करे, वीज वितरण कंपनीचे अधिकारी प्रदिप डालू, बालाजी चात्रे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रतिनिधी निखिल कुमार, धीरज सहा, पोलीस अधिकारी सचिन कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी डॉ. आदित्य सिरसाट, वन खात्याचे मनोज साळवी, ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे यांच्यासह विविध खात्याचे शासकीय अधिकारी उपस्थित होते

# अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त पनवेल तालुकास्तरीय रंगभरण स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागातर्फे मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज दि.१ ऑगस्ट रोजी रंगभरण स्पर्धेचे तालुका स्तरीय आयोजन करण्यात आले .



या स्पर्धेचे उद्घाटन जे. बी. एस. पी. संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य राहुल घरत यांच्या हस्ते करण्यात आले. ह्या स्पर्धेसाठी पनवेल तालुक्यातील तब्बल ४५ शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे परिक्षण जे. के.आर्ट कॉलेज वडाळाच्या शिक्षिका श्रद्धा धनावडे यांनी पाहिले प्रमुख पाहुणे राहुल घरत यांनी विजेत्यांचे कौतुक करत उपस्थित शाळांचे शिक्षक आणि पालकांचे विशेष आभार मानले.

या स्पर्धेसाठी पालक शिक्षक संघाच्या प्रतिनिधी शर्वरी पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी उपस्थित होत्या. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जागृती फाऊंडेशनच्या वतीने रविवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी पनवेलमध्ये मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

शहरातील साईनगरमधील श्री साई गणेश मंदिर येथे सकाळी ९ वाजता या शिबिराला सुरुवात होणार असून शिबिरात रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन, नेत्र, त्वचा, केस, दातांची तपासणी या शिबिरात होणार आहे. यासाठी डॉ. के.सी. डायग्नोसिस, माजी नगरसेवक श्रीकांत ठाकूर, श्री साई ब्लड बँक यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जागृती फाऊंडेशनचे अध्यक्ष व सा. पनवेल युवाचे संपादक निलेश सोनावणे यांनी केले आहे.

# ‘कथल : अ जॅकफ्रूट मिस्ट्री’, ‘श्यामची आई’ची राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये बाजी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

७१व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा शुक्रवारी (दि. १) दिल्ली येथे करण्यात आली. यंदा शाहरुख खानला तब्बल ३३ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पहिला राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला आहे. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार विक्रांत मॅसी आणि शाहरुख खान यांना विभागून देण्यात आला आहे, तर राणी मुखर्जी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री ठरली आहे. हिंदीत ‘कथल : अ जॅकफ्रूट मिस्ट्री’, तर मराठीत ‘श्यामची आई’ चित्रपट सर्वोत्कृष्ट ठरला आहे.

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन–केरला स्टोरी–सुदीप्तो सेन, सर्वोत्कृष्ट अभिनेता–शाहरुख खान (जवान) आणि विक्रांत मॅसी (१२th Fail), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री–राणी मुखर्जी (मिसेस चॅटर्जी वर्सेस नॉर्वे), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता –विजयराघवन (पूक्कलम) आणि मुथुपेटाई सोमू भास्कर (पार्किंग), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री–उर्वशी (उल्लोझुक्कू) आणि जानकी बोडीवाला (वश), सर्वोत्कृष्ट बालकलाकार –सुक्रिती वेणी बंदरेड्डी, कबीर खंडाणे आणि त्रिशा ठोसर, सर्वोत्कृष्ट पटकथा–साई राजेश नीलम (बेबी) आणि रामकुमार बालकृष्ण (पार्किंग), सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शन–वाथी (तामिळ), सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत–Animal Movie हर्षवर्धन रामेश्वर, सर्वोत्कृष्ट गीत–बालगम (द ग्रुप), सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक–पीव्हीएमएस रोहित (प्रेमिथुन्ना), सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका–शिल्पा राव (Chaliya, जवान) आदींना पुरस्कार जाहीर झाले आहेत.

# म्हसळ्यात नातवाने केला आजोबाचा खून; काही तासांतच अटक

**म्हसळा : प्रतिनिधी**

आपल्या वडिलांचा खुन झाल्याची फिर्याद असगर अली शौकत परदेशी याने म्हसळा पोलीसात दिली. पोलिस चौकशीत म्हसळा शहरातील खोंडा मोहल्ला येथील ७२ वर्षीय आजोबाचा खून नातवाने केल्याचे उघडकिस आले आहे. सदर गुन्हा गुरुवार ( दि.३१ ) रोजी सायं ५.३० वा घडला.

चौकशी सुरु असतानाच फिर्यादी,त्याचा मुलगा,अन्य नातलगांच्या वेगवेगळ्या वक्तव्या वरून यात काही तरी दडले आहे हा संशय पोलिसांना बळावल्यामुळे मयत शौकत अलीचे मारेकरी जवळचे आसल्याचे पोलीसानी नक्की केले.माणगाव येथील कॉलेज मध्ये शिक्षण घेत आसलेला मयताचा नातू महमद असगर अली परदेशी वय १८वर्ष ७ महीने याला आरोपी म्हणून ताब्यात घेण्यात आल्याची माहिती ठाणे अम्मलदार नवनाथ दामोदर देवढे यानी दिली.

मयत आजोबा हे आरोपीला तुम कितना भी शिक लो,तेरा कुछ नहि हो .ना तुम सुधर सकता है ’ तुम ऐसेंही रहोंगे ’असे सतत बोलत आसल्याने व आरोपीचे आईकडे वाईट नजरेने पहात असत याचा आरोपी नातवाच्या मनात प्रचंड राग आल्याने सदरचा प्रकार केला.

पान १ वरून

## कॉ. भूषण पाटील लोकांच्या सेवेसाठी काम करणारे नेते –लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी कॉ. भूषण पाटील यांच्या कार्यावर आधारित कामगार, कष्टकरी, प्रकल्पग्रस्त, दीनदुबळ्यांचा विश्वस्त या गौरव ग्रंथाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्याचप्रमाणे गौरव समितीच्या वतीने त्यांना सन्मानित करण्यात आले. कामगार नेते संतोष पवार यांनी सन्मानपत्राचे वाचन केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रफुल्ल वशेणीकर यांनी केले.

# पेणमधील कोलेटीजवळ एसटी आणि ट्रकचा अपघात

**पाली : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावर कोलेटी गावाजवळ शुक्रवारी (ता. १) सकाळी नऊ वाजताच्या सुमारास एसटी व ट्रकचा अपघात झाला. या अपघातात ट्रक चालकाचा पाय तुटला आहे. अपघातात ट्रकच्या चालकाकडील बाजूचा भाग आत मध्ये ठोकला गेला. त्यामुळे चालकाचा पाय त्यामध्ये अडकला होता. ताबडतोब स्थानिकांच्या मदतीने ठोकलेल्या एसटीला लोखंडी साखळदंड लावून ट्रकचा आतमध्ये घुसलेला भाग खेचण्यात आला व चालकाला बाहेर काढण्यात आले. त्यानंतर चालकाला पुढील उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले आहे.



**GOVERNMENT SERVENTS CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED**

(Reg. No. KBA/HSG 107 dT. 15-8-66)

Office Address: CIDCO Plot No. 2/53, Chaitra Marg, Sector No. 2, New Panvel, Dist Raigad

## जाहीर नोटीस

सर्व सभासदांना सूचित करण्यात येते की, आमच्या सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, Government Servents Co-operative Housing Society Limited (also known as Sarkari Nokar Sahakari Malki Gruha Nirman Sanstha Maryadit), (Reg. No. KB-/HSG 107 DT.15.08.1966) कार्यालयीन पत्ता सिडको प्लॉट क्र.२/५३, चैत्र मार्ग, सेक्टर–०२, नवीन पनवेल येथील काही सभासद दीर्घकाळापासून सोसायटीच्या कोणत्याही कामकाजात सहभागी नसून, त्यांनी कोणताही संपर्क ठेवलेला नाही. खालीलप्रमाणे अशा सभासदांची यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे:

**सभासदांची यादी**

| SR NO | NAME AS PER CIDCO | Name in Marathi |
|---|---|---|
| 1 | Kashinath Balaji Gaikwad | काशिनाथ बालाजी गायकवाड |
| 2 | Ganpat Sambhaji Wadkar | गणपत संभाजी वाडकर |
| 3 | Madhav Atmaram Danave | माधव आत्माराम दानवे |
| 4 | Hussain Abbas Khatib | हुसेन अब्बास खातिब |
| 5 | Vaman Govind Mule | वामन गोविंद मुळे |
| 6 | Shrikant Shankar Ghodkhindi | श्रीकांत शंकर घोडखिंडी |
| 7 | S. U. Pradhan | शरद उमाकांत प्रधान |
| 8 | P. M. Thale | पी. एम. थळे |
| 9 | M. S. Mundhe | एम. एस. मुंढे |
| 10 | Sakharam Sitamram Padwal | सखाराम सिताराम पडवळ |
| 11 | Rambhau Walku Gavandi | रामभाऊ वाळकू गवंडी |
| 12 | Harishchandra Shivram Pawar | हरीशचंद्र शिवराम पवार |
| 13 | A. D. Sane | अ. द. साने |
| 14 | Vasant Kanu Singasane | वसंत कानू सिंगसाने |
| 15 | Dattatrya Maruti Ghanekar | दत्तात्रय मारुती घाणेकर |
| 16 | Balkrusna Nana Dawate | बालकृष्ण नाना दवटे |
| 17 | Narsudas Bhiku Gandhi | नरसुदास भीकू गांधी |
| 18 | Bapurao Krushnaji Bhosale | बापूराव कृष्णाजी भोसले |
| 19 | Krushna Laxman Kolge | कृष्णा लक्ष्मण कोलगे |
| 20 | Manohar Ganpat Waskar | मनोहर गणपत वासकर |
| 21 | Madhukar Ramchandra Mokashi | मधुकर रामचंद्र मोकाशी |
| 22 | Sharadkumar Shriniwas Rao | शरदकुमार श्रीनिवास राव |
| 23 | R. V. Lonkar | आर. व्ही. लोणकर |
| 24 | Vasant Ganesh Dongre | वसंत गणेश डोंगरे |
| 25 | Madha Narayan Deshpande | माधव नारायण देशपांडे |
| 26 | K. S. Thakur | के. एस. ठाकूर |
| 27 | Keshav Damodar Bhat | केशव दामोदर भट |
| 28 | Yashwant Balkrishan Paradkar | यशवंत बालकृष्ण पराडकर |
| 29 | Bal Gangadhar Dharap | बाळ गंगाधर धरप |
| 30 | Shankar Dagaduji Salvi | शंकर दगडूजी साळवी |
| 31 | Krishnaji Baburao Sawant | कृष्णाजी बाबूराव सावंत |
| 32 | Kamlakar Shripad Warerkar | कमलाकर श्रीपाद वरेरकर |
| 33 | Suryakant Raghunath Deshpande | सुर्यकांत रघुनाथ देशपांडे |
| 34 | Suresh Krushna Kamat | सुरेश कृष्णा कामत |
| 35 | Manohar Krushnarao Deshpade | मनोहर कृष्णराव देशपांडे |
| 36 | Dattatray Ramchandra Kadam | दत्तात्रय रामचंद्र कदम |
| 37 | Raghunath Tukaram Sondkar | रघुनाथ तुकाराम सोंडकर |
| 38 | Madhukar Shridhar More | मधुकर श्रीधर मोरे |
| 39 | Ramakant J. Nagavekar | रमाकांत ज. नागवेकर |
| 40 | P. H. Chonkar | पी. एच. चोणकर |
| 41 | Bhaskar Narayan More | भास्कर नारायण मोरे |
| 42 | Shrikrishn Shridhar Bhise | श्रीकृष्ण श्रीधर भिसे |
| 43 | Dattatray Shankar Godabole | दत्तात्रय शंकर गोडबोले |
| 44 | Raghunath Krushnaji Johdhale | रघुनाथ कृष्णाजी जोंधळे |
| 45 | Vasant Anant Helekar | वसंत अनंत हेलेकर |
| 46 | Vinayak Kashinath Tipnis | विनायक काशिनाथ टिपणीस |
| 47 | V. P. Patil | व्ही. पी. पाटील |
| 48 | R. R. Kochreker | आर. आर. कोचरेकर |
| 49 | V. S. Naik | व्ही. एस. नाईक |
| 50 | Shataram Daji Haldankar | शांताराम दाजी हळदणकर |
| 51 | Namdeo Ramchandra Patil | नामदेव रामचंद्र पाटील |
| 52 | P. S. Ghadge | पी. एस. घाडगे |
| 53 | V. B. Thuse | व्ही. बी. ठुसे |
| 54 | D. M. Tamhankar | डी. एम. ताम्हणकर |
| 55 | Dattatraya Atmaram Ambye | दत्तात्रय आत्माराम अंबिये |
| 56 | S. A. Engineer | एस.ए. इंजिनियअर |
| 57 | Vinayak Jaitu Raut | विनायक जयतु राऊत |
| 58 | K.V.Thakur | के. व्ही. ठाकूर |
| 59 | M. B. Khandagale | एम. बी. खंडागळे |
| 60 | P.S. Manchekar | पी. एस. मंचेकर |
| 61 | I. A. Chogule | आय. अ. चोगुले |
| 62 | A. G. Patil | ए. जी. पाटील |
| 63 | A.D. Tribhuvan | ए. डी. त्रिभुवन |
| 64 | John Paul Tribhuvan | जॉन पॉल त्रिभुवन |
| 65 | V. S. Pavshe | व्ही. एस. पावशे |
| 66 | W. S. Walavakar | डब्ल्यू एस. वालावलकर |
| 67 | C. S. Karnik | सी. एस. कर्णिक |
| 68 | R. G. Kadam | आर. जी. कदम |
| 69 | B.B. Gothavade | बी. बी. गोतावडे |
| 70 | Sadashiv Gangaram Chavan | सदाशिव गंगाराम चव्हाण |
| 71 | M. K. Samarth | एम. के. समर्थ |
| 72 | L. K. Kunte | एल. के. कुंटे |
| 73 | S. M. Vaishampayan | एस. एम. वैशंपायन |
| 74 | K. B. Gurjar | के. बी. गुर्जर |
| 75 | D. G. Salvi | डी. जी. साळवी |
| 76 | V. V. Shetye | व्ही. व्ही. शेट्ये |
| 77 | D. R. Phadke | डी. आर. फडके |
| 78 | V. V. Joshi | व्ही. व्ही. जोशी |
| 79 | R.N. Kulkarni | आर. एन. कुलकर्णी |
| 80 | G. B. Patil | जी. बी. पाटील |
| 81 | T. J. Bade | टी. जे. बडे |
| 82 | M.S. Deshmukh | एम. एस. देशमुख |
| 83 | E. K. Patil | ई. के. पाटील |
| 84 | G. B. Potdar | जी. बी. पोतदार |
| 85 | U. S. Randive | यू. एस. रणदिवे |
| 86 | P. K. Jadhav | पी. के. जाधव |
| 87 | D. S. Kubal | डी. एस. कुबल |
| 88 | M.B. Patil | एम. बी. पाटील |
| 89 | A. K. Karmarkar | ए. के. करमरकर |
| 90 | V.S. Kamat | व्ही. एस. कामत |
| 91 | S. K. Tipnis | एस. के. टिपणीस |
| 92 | S. R. Naik | एस. आर. नाईक |
| 93 | D. R. Patil | डी. आर. पाटील |
| 94 | D. V. Mehata | डी. व्ही. मेहता |
| 95 | K. A. Salunke | के. ए. साळुंके |
| 96 | S. N. Pradhan | एस. एन. प्रधान |
| 97 | G. M Pai | जी. एम. पै |
| 98 | V. L Gawai | व्ही. एल. गवई |

वरील सभासदांचे अलीकडील पत्ते अथवा संपर्क उपलब्ध नसल्यामुळे संस्थेच्या वतीने ही सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी, कोणतीही व्यक्ती/वारस यांना वरील सभासदांच्या संदर्भात कोणतेही कायदेशीर दावा, मालकी, वारस हक्क, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत संस्थेच्या नावावर **लेखी स्वरूपात व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतींसह** तसेच पॅनकार्ड व आधारकार्ड घेऊन सोसायटीच्या कार्यालयात सादर करावी.

**निश्चित कालावधीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दावे अथवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.**

ही नोटीस संबंधित सर्व व्यक्तींना वैध व पुरेशी कायदेशीर पूर्वसूचना मानण्यात येईल.

**सचिव/–**
**सरकारी नोकर सहकारी गृह निर्माण संस्थां मर्यादित**
**सेक्टर २, नवीन पनवेल**

# पनवेल मनपाकडून यंदाच्या मालमत्ता कर सवलतीमध्ये ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आर्थिक वर्ष २०२५-२६साठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्ताधारकांसाठी मालमत्ता कराची देयके ऑनलाईन तसेच प्रत्यक्ष स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार, चालू आर्थिक वर्षातील ३१ जुलै पर्यंत एकरकमी कर भरणाऱ्यांसाठी देण्यात आलेली ५ टक्के सवलत ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.



महानगरपालिका क्षेत्रातील सन २०२५- २०२६ आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके तयार (जनरेट) करणेत आलेली आहेत. ज्या मालमत्ता धारकांना अद्यापपर्यंत मालमत्ताकराची देयके प्राप्त झालेली नाहीत, त्या मालमत्ता धारकांनी panvelmc.org किंवा PMC TAX - APPवर नोंदणी करुन ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घ्यावीत.

पनवेल महानगरपालिकेच्या या शास्ती अभय योजनेला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. गुरूवारी आजपर्यंतचे सर्व विक्रम मोडीत निघून सर्वोच्च असा विक्रम होऊन एका दिवसात सुमारे १७ कोटी ८४ लाख इतका कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला. अभय योजनेंतर्गत प्रामुख्याने १८ जुलै ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ९० टक्के सूट मिळणार आहे. तसेच १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालाधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ७५ टक्के सूट मिळणार आहे.

याचबरोबर या पुढील काळात म्हणजे १ ते १० सप्टेंबर कालावधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ५० टक्के सूट मिळेल. आणि ११ सप्टेंबर ते २० सप्टेंबर या कालाधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास असलेल्या शास्तीमध्ये २५ टक्के सूट मिळणार आहे. ही अभय योजना केवळ एकवेळची विशेष आणि अंतिम बाब म्हणून जाहीर करण्यात आली आहे.या योजनेचा मालमत्ताधारकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# पाच लाख रुपये घेऊन चौकडी पसार

**पनवेल : वार्ताहर**

बोलण्यात गुंतवून पाच लाख रुपयांची निळ्या रंगाची सॅक जबरदस्तीने खेचून चौघेजण इटिंगा कारमधून पळून गेले. याप्रकरणी रमेश पटेल आणि चार अनोळखी इसमांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हे

तौहिद खान हा नालासोपारा येथे राहत असून त्याला एजंट अमोल याचा फोन आला आणि प्लॉट खरेदी करायचा आहे का? असे विचारले. मामा अब्दुल कादर यांना प्लॉट पसंत पडला तर खरेदी करण्यास तयार होईन, असे खान याने सांगितले. अमोलने फोन करून कॉन्फरन्सवर जयेश या त्रयस्थ इसमासोबत खानचे बोलणे करून दिले. यावेळी पनवेलमध्ये जागा दाखवतो, यासाठी पाच लाख रुपये घेऊन पनवेल स्टेशन येथे येण्यास सांगितले.

त्यानुसार खान पनवेल स्टेशन येथे आल्यावर त्यांनी जयेशला फोन केला असता रमेश हा इसम तुम्हाला न्यायला येईल असे सांगितले. यावेळी एक इसम त्यांच्या जवळ आला व त्याने रमेश पटेल असे त्याचे नाव सांगितले. अब्दुल कादर हे पैसे घेऊन आले. यावेळी ते तिघेजण जागा बघण्यासाठी पुढे चालत गेले. यावेळी पाठीमागून आलेल्या इटिंगा कार मधिल इसमांनी मारण्याची धमकी देत पैशांची बॅग घेऊन पळ काढला.

## पोलीस असल्याची बतावणी करून महिलेची लूट

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून पनवेल तालुक्यातील एका महिलेचे दागिने चोरट्यांनी लंपास केल्याची घटना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे पनवेल तालुक्यातील वलप गावाजवळ व्यवसाय करणाऱ्या ५० वर्षीय महिलेला पोलीस असल्याचे सांगून ६१ हजार रुपयांचे दागिने चोरून नेले आहे . या बाबत अज्ञात इसमा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अज्ञात चोरट्यांनी किराणा माल व मोबाइलचे दुकान फोडले

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात चोरट्याने किराणा मालाचे दुकानसह मोबाइलचे दुकान फोडल्याची घटना तालुक्यातील रोहिंजण गाव परिसरात घडली आहे. नकुल पाटील यांचे रोहिंजण बस स्टॉपजवळ नियती मोबाइल शॉपचे दुकान आहे. त्यांच्या मोबाइलचे शॉपचे शटर उचकटून चोरट्यांनी चोरी केली. यावेळी बाजूला असलेल्या किराणा मालाचे दुकानातूनदेखील चोरांनी चोरी केली. या प्रकरणी तळोजा पोलिस अधिक तपास करत आहेत.

## तोतया पोलिसाने महिलेस लुबाडले

**पनवेल : वार्ताहर**

फूटपाथवरून चालत असताना ३९ वर्षीय महिलेच्या गळ्यातील १८ ग्रॅमची चेन खेचून चोरटे पसार झाले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वीणा घाडगे या खारघर, सेक्टर २० येथे वास्तव्यास आहे. त्या सकाळी विश्वज्योत शाळेच्या बाजूच्या रस्त्याने पायी जात होत्या. यावेळी फूटपाथवरून चालताना दोन इसम मोटारसायकलवरून आले आणि पोलीस असल्याचे सांगितले. मात्र, घाडगे यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर थोड्या वेळाने रेनकोट घातलेले दोन इसम मोटारसायकलवर आले आणि तुमच्या गळ्यातील सोने आहे ते काढा, असे सांगितले. घाडगे यांनी चेन काढून त्यांच्या हातातील कागदात ठेवली आणि कागदामध्ये गुंडाळून त्यांनी घाडगे यांच्या हातात दिली. थोडे अंतर चालत गेल्यावर त्यांनी गुंडाळलेली सोन्याची चेन पाहिली असता चेन ऐवजी दुसरी रुद्राक्षांची माळ होती. त्यांनी मागे पाहिले असता ते दोन्ही इसम मोटारसायकलवरून पळून गेले.

# काळुंद्रे, भिंगारी आणि तक्का येथील शाळांमध्ये वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करुन प्रगती करावी आणि आपल्या शाळेचे तसेच आई वडलांचे ना मोठे करावे असे प्रतिपादन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी प्रभाग २० मधील शाळांच्या मध्ये आयोजीत करण्यात आलेल्या वह्या वापटच्या कार्यक्रमा वेळी केले.

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यामाध्यामतून गेल्या अनेक वर्षापासून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेृत्वाखाली शैक्षणिक उपक्रम राबवून गरजू विद्याथ्यारची मदत करण्यात येते. त्यानुसार मंडळाच्यावतीने रायगड जिल्हा परिषदेच्या काळुंद्रे, भिंगारीआणि तक्का येथील शाळांमध्ये वह्या वाटपचा कार्यक्रम तसेच पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिचसाचे औचित्य साधून माजी नगरसेवक सुनिल बहिरा यांच्या वतीने रायटींग पॅड वाटपाचा कार्यक्रम शुक्रवारी आयोजीत करण्यात आला होता.

यावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या आणि रायटींग पॅडचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अजय बहिरा, सुनिल बहिरा, गणेश कडू, तेजस कांडपीळे, प्रभाकर बहिरा, नेरे मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, राघुनाथ बहिरा, महेश राऊळ, केंद्र प्रमुख बाळाराम चिखलेकर, बुथ अध्यक्ष सचिन चिखलेकर, विशाल म्हस्कर, वसंत घरत, भाऊ म्हस्कर, मेघराज घरत, राजमुकारी मीना, प्रविण घरत, परेश चिखलेकर, किशोर म्हस्कर, विकास म्हस्कर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इतर मान्यवर उपस्थित होते.







पनवेल : उलवे येथील रॅडक्लिफ स्कूलचा विद्यार्थी सिद्धार्थ दासने दोरीच्या सहाय्याने तीन मिनिटांत सर्वाधिक बॅकवर्ड स्किपिंग करण्याचा जागतिक विक्रम मोडून इतिहास घडवला आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिद्धार्थचे अभिनंदन केले तसेच त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी सिद्धार्थचे वडील संतोष दास आणि आई शंपा दास उपस्थित होते. यापूर्वीचा विक्रम ७०५ स्किपिंगचा होता, जो सिद्धार्थने ७११ बॅकवर्ड स्किपिंग करून मोडला आणि एक नवा जागतिक बेंचमार्क प्रस्थापित केला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे सिद्धार्थने आता केवळ एक किंवा दोन नव्हे, तर तीन गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स आपल्या नावावर केले आहेत.

पनवेल : भारतीय जनता पक्षाचे पळस्पे विभागीय जि.प. अध्यक्ष अनेश ढवळे यांचा वाढदिवस शुक्रवारी साजरा झाला. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अनेश ढवळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी सरपंच योगेश लहाने, अशोक म्हात्रे, प्रभाकर नाईक, रुपेश शेंडे, राम म्हात्रे, रवींद्र शेळके आदी उपस्थित होते.





पनवेल : भारतीय जनता पक्षाचे उलवे नोड उपाध्यक्ष अवधेश महतो यांचा वाढदिवस शुक्रवारी साजरा झाला. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अवधेश महतो यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी अकलेश यादव, उदय गायकवाड, अवनिश सिंग, कृष्ण कुमार जैन, दिलबर सिंग, रमेश शेट्टी, कपिल यादव, संदीप मगर उपस्थित होते.



पनवेल : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात साजरी करण्यात आली. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, किशोर सुरते, विश्वजित पाटील, माधव गांगुर्डे, अंकुश पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यानी अभिवादन केले.

|| Vidya Vinayen Shobhate ||
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
CHANGU KANA THAKUR
Arts, Commerce and Science College, New Panvel (Autonomous)
Accredited with A++ Grade by NAAC (4th Cycle-CGPA-3.52)
'College with Potential for Excellence' Status Awarded by University Grants Commission
'Best College Award' by University of Mumbai
A++ NAAC
PLACEMENT CELL
AND
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL (IQAC)
Organize
Mega Job Fair 2025
5000+ Youth to Get Opportunities!
70+ Reputed Companies Participating
Date : 2nd August 2025 | Time : 9 :00 AM onwards
Venue : Changu Kana Thakur College, Khanda Colony, Panvel
: Companies Participating :
NO ENTRY FEES
- Dress Code- Professional or Business Casual Attire
- Multiple Copies of Resume and Photocopies of Required Documents

Mr. S. S. Kamble
Chairman
Placement Cell

Prof. (Dr.) B. D. Aghav
Coordinator
Internal Quality Assurance Cell

Prof. (Dr.) S. K. Patil
Principal
C. K. Thakur A. C. S. College
New Panvel (Autonomous)

Candidate Registration QR Code

## संपादकीय

# कुटिल डाव उद्ध्वस्त

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा वापर हिंदू आणि भगव्या दहशतवादाचे नरेटिव्ह रचण्याकरिता केला गेला होता. निवडणुकीत अल्पसंख्याकांचे लांगुलचालन करण्याच्या हेतूने रचलेले हे नरेटिव्ह किती खोटे होते हे 'एनआयए' न्यायालयाने गुरुवारी सुनावलेल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणीच्या निकालाने स्पष्ट झाले. तब्बल १७ वर्षांनी २००८च्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल आला असून प्रकरणातील सर्व सात आरोपींना न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे. दोष सिद्ध करण्यासाठी सादर केलेले पुरावे पुरेसे नाहीत असे न्यायालयाने म्हटले आहे.

**दिनांक २९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगावच्या भिकू चौकातील मशिदीजवळ एका दुचाकीचा स्फोट झाला. तो रमजानचा महिना होता. त्यामुळे लोक मोठ्या संख्येने नमाज अदा करण्यासाठी मशिदीत जात असतानाच हा स्फोट झाला. स्फोटात सहा नागरिकांचा बळी गेला तर शंभरहून अधिक लोक गंभीर जखमी झाले. स्फोटाकरिता वापरली गेलेली दुचाकी साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांच्या नावावर असल्याचा दावा करून त्यांना या प्रकरणात मुख्य आरोपी करण्यात आले व पाठोपाठ या प्रकरणी ११ जणांना अटक करण्यात आली. परंतु मोठी न्यायिक प्रक्रिया आणि तथ्यांच्या आधारे जो निर्णय देण्यात आला त्यात संबंधित सारे आरोप निराधार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाचा वापर करून 'भगवा दहशतवाद' ही संकल्पना रुजवण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला. काँग्रेस आणि डाव्या पक्षांचा हिंदूद्वेष याच्या मुळाशी होता. परंतु आता १७ वर्षांनी सत्य लोकांसमोर आले असून हिंदुत्वाचा व न्यायाचा विजय झाला आहे. २००८ मध्ये केंद्रात गृहमंत्री असलेले पी. चिदंबरम यांनी हिंदू दहशतवाद या शब्दाचा प्रयोग सर्वप्रथम केला. पुढे २०13 साली काँग्रेस पक्षाच्या जयपूर येथील चिंतन बैठकीतही भगव्या दहशतवादाचा उल्लेख झाला. त्यावेळी हा शब्द वापरणारे तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी कालांतराने त्याबद्दल खेदही व्यक्त केला. हा शब्द चुकीचा होता, असे त्यांनी म्हटले. काँग्रेसचे नेते दिग्विजय सिंह यांनी तर भगवा दहशतवाद या संकल्पनेचा पुन्हा पुन्हा उच्चार करत तिचा प्रचार-प्रसार केला. गांधी घराण्याचे कुलदीपक राहुल गांधी यांनी परदेशातही या संकल्पनेचा उल्लेख केल्याचे सांगण्यात येते. हा खरे तर हिंदू धर्म व संस्कृतीचा मोठा अपमान होता व भारतीय जनता पक्षाने त्यावर तीव्र आक्षेपही नोंदवला. पुढे मालेगाव स्फोटासोबतच समझौता एक्स्प्रेस, अजमेर शरीफ या स्फोटांशीही या शब्दाच्या वापराला जोडण्यात आले. आता एनआयए न्यायालयाने गुरुवारी दिलेल्या निकालाने काँग्रेसप्रणित युपीए सरकारचे हिंदू दहशतवाद व भगवा दहशतवाद दाखवण्याचे षड्यंत्र उघड झाले आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाने हिंदू समाजाची माफी मागितली पाहिजे अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. काँग्रेसने संपूर्ण हिंदू समाजाला दहशतवादी म्हणून दाखवण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल काँग्रेस पक्षाने जाहीरपणे माफी मागितली पाहिजे असे फडणवीस यांनी म्हटले आहे. हा बॉम्बस्फोट घडला त्यावेळी काँग्रेसचेच सरकार होते. तेव्हा हा बॉम्बस्फोट कुणी केला, तेव्हाच्या यंत्रणेने काय तपास केला हे त्या यंत्रणेलाच विचारावे लागेल अशी मार्मिक टीकाही त्यांनी केली. वास्तवत: निव्वळ राजकीय फायद्यासाठी सत्तेचा गैरवापर करीत हिंदू समाजाला संशयाच्या छायेत आणून आपले लांगुलचालनाचे राजकारण साधण्याचा काँग्रेसचा कुटिल डाव अखेर गुरुवारच्या निकालाने उद्ध्वस्त झाला आहे.**

# गृहनिर्माण धोरण : सर्वांसाठी घराच्या दिशेने वाटचाल

राज्यातील सर्वांना घरे मिळावीत, पुनर्विकास प्रकल्पांना चालना मिळावी, झोपडपट्टीमुक्त राज्य व्हावे, शाश्वत आणि समावेशक शहरीकरण व्हावे या उद्देशाने राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण धोरण- २०२५ लागू केले आहे. सन २०३० पर्यंत सर्वांसाठी सुरक्षित, परवडणारे आणि समावेशक घर उपलब्ध करून देण्याचा या धोरणाचा उद्देश आहे.

नोकरदार महिलांसाठी गृहनिर्माण: महाराष्ट्रातील महिला कामगार वर्गाचा सहभाग ३१% आहे. नोकरदार महिलांसाठी विकसित केलेली सर्व गृहनिर्माण मालमत्ता केवळ भाडे करारावरच वितरित केली जाईल. प्रमुख नोकरी केंद्रांपासून ५ किलोमीटर अंतरावर ही गृहनिर्माण केंद्र असतील.

एकात्मिक वसाहतींमध्ये परवडण्याजोगी गृहनिर्माण : ४० हेक्टर (१०० एकर) किंवा त्याहून अधिक क्षेत्रावर एकात्मिक वसाहत प्रकल्प राबवण्यास परवानगी आहे, ज्यात किमान १५% मूळ निवासी चटई क्षेत्र निर्देशांक सामाजिक गृहनिर्माणासाठी राखीव असेल.

प्रकल्पबाधित व्यक्तींसाठी गृहनिर्माण : प्रकल्पबाधित लोकांसाठी पर्यायी घर, निश्चित भरपाई आणि उपजीविकेसाठी सहाय्य प्रदान करण्याची तरतूद सुनिश्चित केली जाते. मुंबईतील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी अंदाजे ५०,००० प्रकल्पबाधित व्यक्तींसाठी घरांची आवश्यकता आहे तसेच मुंबई विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी २,२०,००० घरांची गरज असल्याचे टास्कफोर्सच्या निर्दशनास आले आहे.

मध्यम उत्पन्न गटांसाठी परवडण्याजोगी गृहनिर्माण : शासनाने मध्यम उत्पन्न गटासाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी खाजगी बाजारपेठांना प्रोत्साहन देण्याची योजना आखली आहे. यात निवास खरेदीसाठी व्याज सवलत, अधिमूल्य व विकास शुल्क विकासक हप्त्यांमध्ये शुल्क भरण्याची मुभा या उपाययोजनांचा समावेश.

शासकीय कर्मचारी आणि विशेष प्रवर्गासाठी गृहनिर्माण योजना : शासकीय कर्मचारी आणि विशेष प्रवर्गातील (माजी सैनिक, स्वातंत्र्यसेनानी, दिव्यांग व्यक्ती, कलाकार, पत्रकार इ.) घटकांसाठी विशेष गृहनिर्माण योजना राबवण्याचे प्रयत्न केले जातील. तसेच मुंबईसारख्या शहरांमध्ये आरोग्य सेवेसाठी प्रमुख रुग्णालयांजवळ रुग्णांच्या नातेवाईकांसाठी भाडेतत्वावर गृहनिर्माण करणे तसेच नवीन प्रस्तावित विमानतळांजवळ कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविणे प्रस्तावित आहे.

परवडण्याजोगी भाडे तत्त्वावरील गृहनिर्माण : परवडणाऱ्या भाड्याच्या घरांच्या गरजेसाठी धोरणात्मक उपाययोजना प्रस्तावित आहेत, ज्यात खाजगी विकासकांना करात सूट, सबसिडी आणि नियमांमध्ये शिथिलता यांचा समावेश आहे.

पुनर्विकास : स्वयं-पुनर्विकास : जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या गृहनिर्माण संस्थांना स्वयं-पुनर्विकासासाठी प्रोत्साहन दिले जाते. पात्र प्रकल्पांना अतिरिक्त १०% चटई क्षेत्र निर्देशांक मिळेल. तसेच ९ मीटरपेक्षा कमी रुंदी असलेल्या रस्त्यालगतच्या भूखंडासाठी ०.४ टक्के चटईक्षेत्र मोफत देण्यात येईल, यासह इतर सवलती, प्रोत्साहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासाठी स्वयं-पुनर्विकास कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. यामार्फत सहकारी गृहनिर्माण संस्थांना आवश्यक ते सर्व सहाय्य करण्यात येईल.

समूह पुनर्विकास : शहरीकरणाच्या प्रक्रियेत एकल इमारतींचा पुनर्विकास न करता समूह पुनर्विकास केल्यास नागरी पुनरुत्थानाची प्रक्रिया अधिक समाजाभिमुख होते.

जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास - या अंतर्गत एमएमआर साठी तयार करण्यात येणाऱ्या आर्थिक मास्टर प्लॅन अंतर्गत १० लाख परवडणाऱ्या घरकुलांची निर्मिती करणे आणि त्यासाठी पुनर्विकासाला प्रोत्साहण देण्यात येणार आहे.तसेच म्हाडाच्या वसाहती, जुन्या भाड्याने दिलेल्या इमारती तसेच उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी विविध उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन व पुनर्विकास : या अंतर्गत मोठ्या खासगी जमिनीच्या भूखंडावर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अतिरिक्त तरतुदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. यामुळे झोपडपट्टी रहिवाशांची संमती आवश्यक नाही, विकासकाकडे योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध राहिल तसेच मोठ्या क्षेत्रामुळे झोपडपट्टी रहिवाशांसाठी पर्यायी संक्रमण शिबिरांची तरतूद होईल.

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये नवीन झोपडपट्ट्या निर्माण होऊ नयेत, यासाठी गृहनिर्माण विभागात विशेष अंमलबजावणी विभाग स्थापन करण्यात येणार आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील खासगी जमीन मालकांना २५ टक्के नुकसानभरपाई प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे.

विविध कारणांमुळे ठप्प पडलेल्या सार्वजनिक जमिनींवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंबंधित विकासक म्हणून झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणास प्रस्तावित करण्यात आले आहे.

एका प्रभागातील दोन किंवा त्यापेक्षा अधिक झोपडपट्ट्या असल्यास त्या समूह म्हणून पुनर्विकसित करता येतील. याशिवाय इतर अनेक सुविधा झोपडपट्टी पुनर्विकासासाठी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

### क. हरित इमारत उपक्रम आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान

नावीन्यपूर्ण बांधकाम तंत्रज्ञान: नवीन, नावीन्यपूर्ण आणि पर्यावरणपूरक बांधकाम तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे महत्त्वाचे आहे, ज्यामुळे बांधकाम खर्च कमी होईल आणि गुणवत्ता सुधारेल. तसेच हरित पद्धती स्विकारणाऱ्या क्लस्टर प्रकल्पांना तंत्रज्ञान नवोपक्रम अनुदान प्रदान करणे, पुरस्कार देणे, नवीन बांधकाम सामग्री आणि नवीन तंत्रज्ञानाचा समावेश निविदा प्रक्रियेत करणे आदींची शिफारस करण्यात आली आहे.

हरित (पर्यावरण पूरक) इमारत उपक्रम: इमारती पर्यावरणदृष्ट्या टिकाऊ आणि ऊर्जा कार्यक्षम बनवण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी पारिस्थितीकीय (इको) निवास संहितेचा स्वीकार करणे, प्रकाशविद्युत चालक सौरपट्ट बसविणे, टिकाऊ/शाश्वत साधनसामग्रीचा वापर करणे, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे वापरणे, वृक्षारोपण करणे, उष्णतेपासून दिलासा मिळण्यासाठी उपाययोजना करणे, हरित इमारतींचे प्रचालन आणि परिक्षण करण्यासाठी प्रोत्साहन देणे आदी उद्दिष्टे प्रस्तावित आहे. हरित इमारतींच्या विकासकांना ३ टक्के, ५ टक्के आणि ७ टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र अनुज्ञेय आहे.

### ड. इतर धोरणात्मक उपाय

गृहनिर्माण व बांधकामासाठी वित्तपुरवठा धोरण (महाआवास फंड) : परवडणाऱ्या व सर्वसमावेशक गृहनिर्माण क्षेत्रात गुंतवणूक सुरू करण्यासाठी, राज्य शासनाने २०,००० कोटी रुपयांच्या संभाव्य खर्चासाठी आवश्यक असलेल्या व्यवहारी तूट भरपाई अनुदानाचा मोठा हिस्सा 'परवडणारे गृहनिर्माण निधी'द्वारे उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित केले आहे.

व्यवसाय सुलभता : बांधकाम प्रकल्पांसाठी बांधकाम परवानग्या, पर्यावरण मंजुरी व भोगवटा प्रमाणपत्र यांसह प्रभावी संगणकीकृत प्रक्रिया तसेच एक खिडकी निपटारा प्रणाली लागू करण्यात येईल. विविध अधिमूल्य भरण्याच्या तरतुदीमध्ये समानता सुनिश्चित करणे, प्रकल्प मंजुरीमध्ये सुस्पष्टता, पारदर्शक भूसंपादन प्रक्रिया, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, गृहनिर्माण क्षेत्राला पायाभूत सुविधांचा दर्जा देणे आदी उपाय सुचविण्यात आले आहेत.

स्थावर संपदा नियामक प्राधिकरण : महारेराच्या सक्षमीकरणासाठी पुरेसा कर्मचारीवर्ग, प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांसाठी सेवा प्रवेश नियम तयार करणे, तक्रार निवारणासाठी पुरेसी खंडपीठ व सदस्य संख्या असावी यासाठी उपाययोजना करण्यात प्रस्तावित आहे.

शहर नियोजन सुधारणा : या अंतर्गत डिजिटल हस्तांतरणीय विकास हक्क प्रमाणपत्र वाटप यंत्रणेसाठी ऑनलाईन बँक पोर्टल/अप्लिकेशन तयार करणे, दर्जेदार विरंगुळा स्थळांची निर्मिती करणे, संक्रमणाभिमुख विकास क्षेत्रांमध्ये परवडणाऱ्या गृहनिर्माणासाठई उत्तेजन देणे, उपवर्ती/उपनगरीय शहरे विकसित करणे, आदी उपाययोजना व सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत. याशिवाय ऑनलाईन सुधारणांमध्ये सहभागी नियोजन, सुलभ नियामक प्रक्रिया आणि कार्यक्षम प्रशासन व प्रतिसादक्षम शहरी व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा समावेश यावर भर दिला आहे.

परवडणाऱ्या गृहनिर्माणात कंपन्यांचे सामाजिक उत्तरदायित्व सुकर करण्यासाठी धोरणात सुधारणा करणे: परवडणाऱ्या गृहनिर्माण क्षेत्रात कंपन्यांचे सामाजिक उत्तरदायित्व योगदान सुलभ करण्यासाठी विविध उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

क्षमता निर्मिती व कौशल्य विकास : बांधकाम कामगारांच्या क्षमता वाढीसाठी नवीन कौशल्य विकास केंद्रे उभारणे, विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अद्ययावतीकरण करणे, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळासोबत भागीदारीतून उपक्रम हाती घेणे, सार्वजनिक प्राधिकरणांची क्षमता वाढविणे, खासगी क्षेत्रांना कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यासाठी सहभागी करणे आदी उपाययोजना राबविण्यात येणार आहे. तसेच धोरणात्मक चौकट अधिक बळकट, समावेश व विस्तृत करण्यासाठी नॉलेज पार्टनरची नियुक्ती तसेच बांधकाम तंत्रज्ञान अनुसंधान केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे.

**-नंदकुमार वाघमारे, सहाय्यक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई**



## बदलते तंत्रज्ञान

# ऑगस्टमध्ये पडणार स्मार्टफोनचा पाऊस

जुलै महिना भारतातील स्मार्टफोन प्रेमींसाठी एक रोमांचक महिना ठरला. सॅमसंग गॅलेक्सी झेड फोल्ड ७, सॅमसंग गॅलेक्सी झेड फ्लिप ७ आणि नथिंग फोन ३ सह अनेक स्मार्टफोन बजारात दाखल झाले. दरम्यान, ऑगस्टमध्येही अनेक दमदार स्मार्टफोन लॉन्च होणार आहेत, ज्यात विवो, रेडमीपासून आणि गूगल पिक्सेल कंपनीचा समावेश आहे.



विवो व्हाय ४०० 5G : हा स्मार्टफोन येत्या ४ ऑगस्ट २०२५ मध्ये लॉन्च होणार आहे. हा फोन ग्लॅम व्हाइट आणि ऑलिव्ह ग्रीन रंग पर्यायांमध्ये उपलब्ध होणार आहे. या फोनमध्ये ग्राहकांना ६.६७ इंचाचा फुल एचडी प्लस अमोलेड स्क्रीन डिस्प्ले दिला जाणार असल्याची माहिती आहे. फोटोग्राफीसाठी ग्राहकांना ड्युअर रिअर कॅमेरा सेटअप मिळण्याची शक्यता आहे, ज्याचा मुख्य कॅमेरा ५० मेगापिक्सेलचा असेल.

विवो व्ही ६० : विवो कंपनीचा नवा विवो व्ही ६० येत्या १२ ऑगस्ट २०२५ मध्ये भारतात लॉन्च होण्याची शक्यता आहे. लीक झालेल्या माहितीनुसार, या फोनमध्ये ६.६७ इंचाचा डिस्प्ले मिळण्याची शक्यता आहे. फोनमध्ये ट्रिपल कॅमेरा सेटअप दिला जाऊ शकतो, ज्यात मुख्य कॅमेरा ५० मेगापिक्सेल असेल, अशी अपेक्षा आहे. फोनमध्ये ६ हजार ५०० एमएएच क्षमता असलेल्या बॅटरी मिळण्याची शक्यता आहे, जी ९० वॅट सुपरफास्ट चार्जिंगला सपोर्ट करेल, अशी माहिती आहे.

रेडमी १५ 5G : हा फोन येत्या १९ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय बाजारात एन्ट्री करेल, ज्यात ६.९ इंचाचा डिस्प्ले मिळण्याची शक्यता आहे. शिवाय, हा फोन एआय फिचर्सला समोर्ट करेल. अहवालांनुसार, हा फोन ८ जीबी रॅम आणि २५६ जीबी स्टोरेजमध्ये लॉन्च केला जाऊ शकतो. फोनमध्ये एआय समर्थित ५० मेगापिक्सेल ड्युअल रियर कॅमेरा सेटअप असण्याची शक्यता आहे.

ओप्पो के१३ टर्बो सीरीज : ओप्पो के१३ टर्बो सीरीज लॉन्च करण्याबाबत गॅझेट ३६० ने एक्सक्लुझिव्हली बातमी दिली. या लाइनअपमध्ये दोन मॉडेल्स असण्याची अपेक्षा आहे. या फोनमध्ये ६.८० इंचाचा डिस्प्ले मिळण्याची अपेक्षा आहे. शिवाय, ५० मेगापिक्सेलचा रिअर कॅमेरा आणि ७००० एमएएच क्षमता असलेली बॅटरी मिळू शकते.

# कवी, कादंबरीकार पुरुषोत्तम रेगे

श्रेष्ठ मराठी कवी, तसेच कादंबरीकार नाटककार, समीक्षक व संपादक पुरुषोत्तम शिवराम रेगे यांचा आज जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



## निमित्त

पुरुषोत्तम शिवराम रेगे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मिठबाब येथे झाला. शिक्षण मुंबई व लंडन येथे बी.ए. व बी.एस्सी. पर्यंत. लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून त्यांनी बी.एस्सी. ही पदवी मिळविली होती. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून विविध महाविद्यालयांतून त्यांनी काम केले. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून ते निवृत्त झाले. 'सुहृद चंपा' आणि 'रूप कथ्थक' ही दोन टोपण नावे त्यांनी अनुक्रमे साधना आणि इतर कविता (१९३१) यातील कवितांसाठी तर 'रूपकथ्थक' हे टोपण नाव रंगपांचालिक आणि दोन नाटके (१९५८) या पुस्तकासाठी घेतली होती. त्यांचे अन्य साहित्य पु.शि. रेगे या नावानेच प्रसिद्ध झाले. उदा., छांदसी नावाचा त्यांचा १९६२ साली प्रसिद्ध झालेला समीक्षात्मक लेखांचा संग्रह.

साधना आणि इतर कविता ह्या त्यांच्या काव्यसंग्रहानंतर फुलोरा (१९३७), हिमसेक (१९४३), दोला (१९५०), गंधरेखा (१९५३), पुष्कळा (१९६०), दुसरा पक्षी (१९६६) आणि प्रियाळ (१९७२) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. १९४५ पर्यंतची त्यांची कविता मुक्तच्छंदात लिहिलेली असली, तरी नवकाव्य म्हणता येईल अशीही ती नव्हती. ते वळण १९४५ नंतरचे पण तरीही ते मर्ढेकरी नवकाव्याच्या वळणाचे नव्हते. त्याचे स्वरूप खास रेगेय म्हणता येईल असे होते.


रूपकथ्थक (१९५६) व मनवा (१९६८) हे त्यांचे दोन कथासंग्रह असून त्यांच्या कथांतूनही त्यांच्या कविमनाचे नाजूक पदर व त्यांचे अल्पाक्षरमणीयत्व जाणवते. यांतील काही कथा गुजराती, फ्रेंच, जर्मन, स्वीडिश, स्पॅनिश, रशियन आणि चिनी या भाषांत भाषांतरित झाल्या आहेत.

सावित्री (१९६२), अवलोकिता (१९६४), रेणू (१९७३) आणि मातृका (१९७८) या रेगे यांच्या चारी कादंबऱ्या काव्यात्म व अर्थगर्भ आहेत. त्यातील भावविश्व गूढ, तत्वस्पर्शी, सखोल व समृद्ध आहे. सावित्री ही पत्ररूप कादंबरी असून सावित्री आणि अवलोकिता या कांदबऱ्या परस्परांना पूरक ठरतील अशा स्वरूपाच्या आहेत. रेणू आणि मातृका त्याहून वेगळ्या आहेत. त्यामधूनही त्यांच्या कविमनाचे स्त्रीत्वाविषयीचे आकर्षण प्रकट झाले आहे.

रेगे यांना १९६५ मध्ये रशियाचा प्रवास करण्याची संधी लाभली. मॉस्को येथे लघुकथा या विषयावर आयोजित केलेल्या परिसंवादात एक भारतीय प्रतिनिधी म्हणून त्यांनी भाग घेतला. १९६५ मध्ये केरळ येथे झालेल्या अखिल भारतीय लेखक परिषदेचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले. १९६९ सालच्या वर्धा येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मुंबई येथे त्यांचे निधन झाले. रेगे यांना १९६५ मध्ये रशियाचा प्रवास करण्याची संधी लाभली. मॉस्को येथे लघुकथा या विषयावर आयोजित केलेल्या परिसंवादात एक भारतीय प्रतिनिधी म्हणून त्यांनी भाग घेतला. १९६५मध्ये केरळ येथे झालेल्या अखिल भारतीय लेखक परिषदेचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले. १९६९ सालच्या वर्धा येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रिकाम्या पोटी कडुलिंबाची पाने खाल्ल्याने असा परिणाम...

आयुर्वेदात कडुलिंबाला फक्त एक झाडच नाही तर एक नैसर्गिक औषध मानले जाते. ते 'सर्व रोग निवारणी' म्हणजेच सर्व रोगांचे उच्चाटन करणारे असल्याचे म्हटले जाते. विशेषतः दररोज सकाळी रिकाम्या पोटी कडुलिंबाची पाने खाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. या बाबात आरोग्यतज्ज्ञांच्या मते, यांनी रिकाम्या पोटी कडुलिंब खाण्याचे असे काही फायदे सांगितले आहेत. चला त्यांच्याबद्दल जाणून घेऊया, तसेच ते खाण्याची योग्य पद्धत देखील जाणून घेऊया.



रोगांपासून बचाव - तज्ज्ञांच्या मते, कडुलिंबाच्या पानांमध्ये अँटीबॅक्टेरियल, अँटीव्हायरल आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. यामुळे सर्दी, फ्लू आणि ताप यांसारख्या हंगामी आजारांपासून संरक्षण मिळते.

साखर नियंत्रण - डॉक्टरांच्या मते, काही संशोधनांच्या निष्कर्षांवरून असे दिसून येते की कडुलिंबाचे सेवन रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित करते, ज्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांना आराम मिळू शकतो.

पचनक्रिया निरोगी राहते - कडुलिंब यकृत आणि आतडे स्वच्छ करते. ते गॅस, बद्धकोष्ठता आणि अपचन यासारख्या समस्या कमी करते. अशा परिस्थितीत, पचनक्रिया बिघडलेल्या लोकांसाठी ते फायदेशीर ठरू शकते.

दातांसाठी फायदेशीर - प्राचीन काळापासून असे मानले जाते की कडुलिंबाने दात घासल्याने दात मजबूत होतात, हिरड्या निरोगी राहतात आणि तोंडाची दुर्गंधी देखील दूर होते. चमकदार त्वचा आणि मजबूत केस - या सर्वांव्यतिरिक्त, तज्ज्ञ म्हणतात की कडुलिंबाचा रस किंवा तेल लावल्याने कोंडा, मुरुम आणि त्वचेच्या ऍलर्जीपासून आराम मिळतो. यासोबतच त्वचा आतून स्वच्छ होते.

सेवन कसे करावे? यासाठी दररोज सकाळी रिकाम्या पोटी ४-५ मऊ कडुलिंबाची पाने धुवून चावा. जर त्याची चव खूप कडू असेल तर तुम्ही ते कोमट पाण्याने गिळू शकता. किंवा तुम्ही पाण्यात मिसळून कडुलिंबाचा रस (२०-३० मिली) देखील पिऊ शकता. डॉक्टर म्हणतात की कडुलिंबाचे सर्व फायदे असूनही, ते जास्त प्रमाणात सेवन करू नका. तसेच, गर्भवती महिला, लहान मुले आणि कमकुवत पचनसंस्था असलेल्यांनी डॉक्टरांना विचारल्यानंतरच ते त्यांच्या दिनचर्येत समाविष्ट करावे.

# अलिबाग समुद्र किनाऱ्यावरील दिवे प्रकाशमान करण्याची भाजपची मागणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील दिवे प्रकाशमान करण्याची मागणी भारतीय जनता पार्टीने (भाजपा) केली आहे.

भारतीय जनता पार्टी अलिबाग तालुका मध्य अध्यक्ष रोशन भगत, अलिबाग दक्षिण तालुका अध्यक्ष अशोक वारगे व अलिबाग भाजपा युवा नेते स्वप्निल गाडे यांनी अलिबाग नगरपरिषदेत जाऊन वीज विभागातील हरिश्चंद्र कुंडल यांना भेटून त्यांना आपल्या मागणीचे निवेदन दिले.

अलिबाग नगरपालिका हद्दीतील समुद्रकिनारी स्ट्रिट लाईट गेल्या काही दिवसापासून संपूर्ण बंद आहे. त्यामुळे संध्याकाळी समुद्रावर येणाऱ्या नागरीकांना चालताना तसेच पर्यटकाना त्रासास होतो. त्याचप्रमाणे वयोवृध्द नागरीक रात्रीच्या वेळी समुद्रकिनारी फिरण्यासाठी येत असतात . दिवे बंद असल्यामुळे तेथे अपघात होऊ शकतो. त्यामुळे अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील बंद असलेले दिवे प्रकाशमान करावेत अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# 'घर घर संविधान'चा पिटसई केंद्रातील शिक्षकांकडून निर्धार

**तळा : प्रतिनिधी**

संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या 'घर घर संविधान' या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्या संकल्पनेनुसार तळा तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये गेल्या वर्षीपासून करण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून ह्या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी पिटसई केंद्रात सुरू झाली आहे. गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाला प्रत्यक्षात आणण्यासाठी केंद्रातील शिक्षकांनी नुकत्याच झालेल्या शिक्षण परिषदेत निर्धार केला.



या परिषदेत संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांनी संविधानाचे महत्त्व विषद केले. संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून ते एक आदर्श जीवनपद्धती शिकवणारे महान तत्त्वज्ञान आहे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक नागरिकाला सन्मानजनक तथा प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. 'घर घर संविधान' हा उपक्रम नक्की काय आहे आणि त्याची अंमलबजावणी नक्की कशी करावी, याविषयी सविस्तर मार्गदर्शन श्री. पठाण यांनी केले.

तालुक्यात सुरू केलेला हा उपक्रम प्रत्येक घरात पोहोचवण्याची नैतिक जबाबदारी आपली आहे, अशी भावना शिक्षकांनी व्यक्त केली.सर्व शिक्षकांनी हा उपक्रम आपल्या कार्यक्षेत्रात यशस्वी करण्याचा निर्धार केला.या परिषदेत निवृत्त झालेले केंद्रप्रमुख दीपक ठाकूर यांचा कृतज्ञता सोहळाही पार पडला. या प्रसंगी केंद्र प्रमुख संतोष पटाईत, नुरखाँ पठाण, केंद्रप्रमुख दीपक ठाकूर, मुंबई गाव अध्यक्ष भागोजी मोरे,शा.व्य.अध्यक्ष अंतरा भात्रे,गावाध्यक्ष राजू गंभीर, स्वप्निल म्हात्रे,प्रतिभा ठाकूर,रविंद्र म्हात्रे, बापूराव रायफळे,राजू थिटेकर आदी मान्यवर व केंद्रातील सर्व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

।।अविश्रमो लोकतंत्राधिकारा।।

## खोपोली नगरपरिषद, खोपोली

ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१० २०३.
फोन नं. (०२१९२)२६४२१२ Email ID :- cokmckhpoli@gmail.com

### जाहिर प्रसिध्दीकरण

खोपोली नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, प्रधान मंत्री आवास योजना शहरी २.० अंतर्गत आपण नवीन घरकुल मंजूरीसाठी https://pmay-urban.gov.in या वेबसाईटवर अर्ज करण्यात यावा. सदरील योजने अंतर्गत घर बांधकामासाठी शासनामार्फत बांधकामाच्या प्रगतीनुसार २.५ लक्ष इतके अनुदान देण्यात येईल.

**नवीन घरकुल मंजूरीसाठी लागणारी कागदपत्रे खालीलप्रमाणे**

१) अर्जदाराचे आधार कार्ड (आधार क्रमांक, आधारनुसार नाव, जन्म तारीख )
२) कुटुंबातील सदस्याचे आधार कार्ड तपशिल (आधार क्रमांक, आधारनुसार नाव, जन्म तारीख)
३) अर्जदाराचे आधारला लिंक असलेले सक्रीय बैंक खाते तपशिल (खाते क्रमांक, बैंकेचे नाव, शाखा, IFSC कोड)
४) उत्पन्नाचा दाखला ३,००,०००/- पर्यंत
५) जात प्रमाणपत्र (SC, ST किंवा OBC च्या बाबतीत)
६) जमिन दस्तऐवज (सिटी सर्व्हे उतारा किया ७/१२ उतारा, सोबत बिनशेती ले-आऊट आणि नगर पंचायत ८अ उतारा)
७) पॅन कार्ड
८) रेशन कार्ड
९) भारतात देशात कुठेही पक्के घर नसलेबाचतचे प्रतिज्ञापत्र
१०) सद्यस्थितीतील घराचा फोटो

वरील सर्व कागदपत्रांच्या (Original) मुळ प्रती वेगसाईटवर अपलोड कराव्यात व घरकूल मंजुरीनंतर त्याचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

जा.क्र. केएमसी/नगररचना/२०
दि.१/०८/२०२५

सही/-
मुख्याधिकारी
तथा प्रशासक
खोपोली नगरपरिषद

# द बर्निंग बाईक; माणगावमध्ये स्कुटी पेटून झाली भस्मसात



**माणगाव : बातमीदार**

शुक्रवार दि.१ ऑगस्ट रोजी दुपारी बाराचे सुमारास हिरो माईस्ट्रो दुचाकीला अचानक आग लागून ती क्षणार्धात भस्मसात झाली आहे. घटनास्थळी बघ्यांची एकच गर्दी पाहावयास मिळाली, काही जण हे दृष्य आपल्या मोबाईल कॅमेर्यात टीपत लांबूनच पाहत होते. काही तरुण मंडळींनी आग लागलेल्या दुचाकीवर बालदीतून पाणी मारुन आग विझविण्याचा काहीसा प्रयत्न केला परंतु आग आणखीनच भडकली आणि दूचाकी पाच ते दहा मिनिटात पूर्ण जळून खाक झाली आहे.

दूचाकीचा चालक उतेखोल कालवा पूला जवळ जात असताना बंद पडल्याने ती पुन्हा किक मारुन सुरु करत असतानाच गाडीने अचानक पेट घेतला म्हणून ती स्टॅण्डवर लावून तशीच सोडून स्वतःचा जीव वाचवून तो बाजूला झाल्याने सुदैवाने कोणतीही इजा झाली नाही. परंतु दूचाकी मात्र आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आहे.

सदरची दुर्घटना नगर पंचायत विभागास कळविताच नगर पंचायतीचे अग्निशमन पथकातील प्रकाश मोरे, सारंग कनोजे घटना स्थळी दाखल झाले परंतु आग विझविण्यास अग्निशमन वाहन बाहेर काढण्याआधीच दूचाकी संपुर्ण पेटून भस्मसात झाली होती वाहतुकीस अडथळा होऊ नये म्हणून नगर पंचायत कर्मचाऱ्यांनी गाडीचा सांगाडा रस्त्याच्या बाजुला सरकवून गाडीचा मलभा बाजुला करत रस्ता रहदारीस मोकळा केला आहे.

## कनक समृध्दी को ऑ. हाऊसिंग सोसायटी मर्यादित पनवेल

प्लॉट क्रमांक ३६, फायनल प्लॉट क्रमांक २०५/१२०, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल, जिल्हा. रायगड-४१०२०६.

### निविदा सूचना

याद्वारे सर्व व्यवसायिक कंत्राटदार इत्यादी यांना सूचित करण्यात येते की सोसायटीने ठरवल्याप्रमाणे पूर्ण बिल्डींगच्या टेरेसवर पत्रे बसविण्याचे असून, अंदाजीय दरपत्रक मागणी करण्यात येत आहे. तरी या कामी इच्छुकांनी आपले दर सादर करावेत. सदर कामाची आपण स्वतः कामाची पाहणी करु शकता. दरपत्रक मागविण्याची शेवटची दि. ०७/०८/२०२५ आहे

**सेक्रेटरी**
कनक समृध्दी को. ऑ. हाऊसिंग सोसायटी
मर्यादित पनवेल. संपर्क : ९८९२१५६८६३

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेतीमालमत्ता ही पोट तुकडी रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती उरण आणि ग्रामपंचायत पिरकोन यांच्या हद्दीत खालीलप्रमाणे आहे :

| गावाचे नाव | सर्वे नंबर क्षेत्र (हे.आ.) | खराबा क्षेत्र (हे.आ.) | एकूण क्षेत्र (हे.आ.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|---|
| पिरकोन | १२२/१ | ००.०३.६० | ००.३९.२० | ४.६३ |

शेतकऱ्यांची नावे :
मालती वसंत गावंड आणि अन्य

वरील नमूद केलेली मालमत्ता ही वंशपरंपरागत व कर्जविहीन स्वरूपात संबंधित मालकांच्या मालकी हक्कात असून त्यांनी सदरहू मालमत्ता कायमस्वरूपी विक्री करण्यास संमती दर्शविली आहे. सदरहू मालमत्ता ही निर्बंधमुक्त व बाजारहट्ट स्वरूपाची असल्याचे विद्यमान मालकांनी स्पष्ट केले आहे.

जर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेला या मालमत्तेवर कोणताही कायदेशीर हक्क, दावे, गहाण, भाडेकरार, खरेदी-विक्री, वारसाहक्क, वसीयत, बँकेचे कर्ज, बंधपत्र, दान, जामीन, टाकावा, खटला, लीज, ट्रस्ट, करार, बंधन किंवा कोणत्याही स्वरूपाचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्या अग्रवाल डेव्हलपर्स यांच्याकडे** लेखी स्वरूपात आवश्यक कागदपत्रांसह दावा सादर करावा.

ठरवलेल्या मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास, वरील मालमत्ता ही पूर्णपणे निर्बंध व वादविवादमुक्त समजली जाईल व कोणालाही कोणताही कायदेशीर हक्क किंवा हितसंबंध उरलेला नाही असे गृहित धरण्यात येईल.

तसेच, यानंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत अथवा वंशपरंपरागत दावा आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. ही बाब सर्वांच्या लक्षात घेण्यात यावी.

ही पेपर नोटीस प्रसिद्ध करण्यात कोणालाही कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही किंवा कोणतीही हरकत नाही असे मी घोषित करतो व या जाहीर नोटीसीवर सही करतो.

**दिनांक : ०१/०८/२०२५**
स्थळ : उरण, रायगड
मोबा : ९८३३४२५०७५

**सही/-**
**बिनोद अग्रवाल**
**अग्रवाल डेव्हलपर्स**
खोपटा- उरण रोड, सतीश कॉम्प्लेक्स,
कोप्रोली - ४००७०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेतीमालमत्ता ही पोट तुकडी रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती उरण आणि ग्रामपंचायत सारडे यांच्या हद्दीत खालीलप्रमाणे आहे :

| गावाचे नाव | सर्वे नंबर क्षेत्र (हे.आ.) | खराबा क्षेत्र (हे.आ.) | एकूण क्षेत्र (हे.आ.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|---|
| सारडे | ११४/१/क | ००.०१.५० | ००.३६.७० | ८.१२ |

एकूण क्षेत्र ०-३६-७० हेक्टर-आर-चौ.मी. पैकी ०-१८-३५ हेक्टर-आर-चौ.मी. क्षेत्र विक्रीयोग्य आहे.

शेतकऱ्यांची नावे :

काशिनाथ हसुराम पाटील, धर्मुबाई मधुकर पाटील, जितेंद्र मधुकर पाटील, बाबीबाई रमण म्हात्रे, शारदा चंद्रकांत गावंड, अनिता हसुराम पाटील, कमळ राजेश इंगळे, राजेंद्र गणपत पाटील, जयश्री दर्शन पाटील, सचिन हरिश्चंद्र पाटील, नीलिमा राधेश्याम पाटील, शोभा जनार्दन पाटील, अश्विनी कैलास म्हात्रे, कल्पना किरण पाटील, करीना आदेश मोकल

वरील नमूद केलेली मालमत्ता ही वंशपरंपरागत व कर्जविहीन स्वरूपात संबंधित मालकांच्या मालकी हक्कात असून त्यांनी सदरहू मालमत्ता कायमस्वरूपी विक्री करण्यास संमती दर्शविली आहे. सदरहू मालमत्ता ही निर्बंधमुक्त व बाजारहट्ट स्वरूपाची असल्याचे विद्यमान मालकांनी स्पष्ट केले आहे.

जर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेला या मालमत्तेवर कोणताही कायदेशीर हक्क, दावे, गहाण, भाडेकरार, खरेदी-विक्री, वारसाहक्क, वसीयत, बँकेचे कर्ज, बंधपत्र, दान, जामीन, टाकावा, खटला, लीज, ट्रस्ट, करार, बंधन किंवा कोणत्याही स्वरूपाचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्या अग्रवाल डेव्हलपर्स यांच्याकडे** लेखी स्वरूपात आवश्यक कागदपत्रांसह दावा सादर करावा.

ठरवलेल्या मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास, वरील मालमत्ता ही पूर्णपणे निर्बंध व वादविवादमुक्त समजली जाईल व कोणालाही कोणताही कायदेशीर हक्क किंवा हितसंबंध उरलेला नाही असे गृहित धरण्यात येईल.

तसेच, यानंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत अथवा वंशपरंपरागत दावा आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. ही बाब सर्वांच्या लक्षात घेण्यात यावी.

ही पेपर नोटीस प्रसिद्ध करण्यात कोणालाही कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही किंवा कोणतीही हरकत नाही असे मी घोषित करतो व या जाहीर नोटीसीवर सही करतो.

**दिनांक : ०१/०८/२०२५**
स्थळ : उरण, रायगड
मोबा : ९८३३४२५०७५

**सही/-**
**बिनोद अग्रवाल**
**अग्रवाल डेव्हलपर्स**
खोपटा- उरण रोड, सतीश कॉम्प्लेक्स,
कोप्रोली - ४००७०२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून २१ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - चेरवली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गट / सर्व्हे नंबर | उपविभाग/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १२ | २ | जिरायत ० -९० - ००<br>वरकर १- ०० - ००<br>पो.ख. ०-५०- ००<br>एकूण २ -४०- ०० | १५.२० | श्री. बाळाराम विठ्ठल लाड |

**एकूण क्षेत्र २ -४० - ०० हे. आर. पॉ. पैकी श्री. बाळाराम विठ्ठल लाड यांचा अविभक्त हिस्सा क्षेत्र १-०२-०० हे. आर. पॉ., पो. खराबा ० -५०-०० हे. आर. पॉ. पैकी हे. आर. पॉ., एकूण क्षेत्र १-५२-०० हे. आर. पॉ. पैकी ०-१८-०० हे. आर. पॉ., आकार ६.७२ रू. पैसे या मिळकतीची.**

**पनवेल.**
**दिनांक ०१/०८/२०२५.**

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

# प्रेस क्लबतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुका प्रेस क्लबच्या विद्यमाने तालुक्यातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. वह्या, पेन, कंपास बॉक्स, पाटी, पेन्सिल, वॉटर फिल्टर, ग्लास आदी साहित्याचे वाटप झाले.

रा.जि.प. शाळा वावे दिवाळी, खर्डी खुर्द, पळसगाव बुद्रुक आदिवासी वाडी, पळसगाव खुर्द, उतेखोलवाडी, भैरीवाडी, केंद्रीय निवासी प्राथमिक आश्रमशाळा दत्तनगर या शाळांमध्ये साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी प्रेस क्लबचे अध्यक्ष संतोष सुतार, कार्याध्यक्ष गौतम जाधव, सचिव हरेश मोरे, उपाध्यक्ष विश्वास गायकवाड, आरती म्हामुणकर, खजिनदार एस. वानरसे, प्रमुख सल्लागार उत्तम तांबे, विनोद सापळे, संघटक पद्माकर उभारे, पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे आदी उपस्थित होते.

## सांगली वैभव कौ ऑप क्रे सोसायटी लि.

एन एल २.४/२ नेरूळ (प) नवि मुंबई ४००७०६
मो. न. ९१६७४९२५३७

### ऑटो रिक्षा विकणे अथवा स्क्रॅप करण्या बाबत जाहिर नोटीस

संस्थेच्या थकित कर्जदार यांना त्यांना तारन असलेल्या रिक्षा कर्जा बाबत अधिकृत नोटीसा दिल्या असुन त्यांना कर्ज भरण्यास व रिक्षा घेउन जाण्यास नोटीसीने कळविले आहे या शिवाय कुणाची काही हरकत असल्यास १५ दिवसाच्या आत संस्थेशी संपर्क करावा अन्यथा खालील यादीतील सर्व रिक्षा लिलाव किंवा स्क्रॅप केल्या जातील याची नोंद घेण्यात यावी

| Sr | A/C | Name | Vehicle | Prmit no | Engine no | Chasis no |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4273 | RAJARAM TUKARAM LOKHANDE | MH-46-AC-1063 | MH46/103582014 | 94881 | 32937 |
| 2 | 4528 | SALMAN YUSUF KHAN | MH-46-AZ-6055 | NO | 04113 | 41492 |
| 3 | 4544 | IQBAL IBRAHIM PAWL | MH-46-AZ-6058 | NO | 04810 | 41912 |
| 4 | 4215 | GANESH RAMESH PATIL | MH-46-C-1803 | MH46/50B2014 | 92398 | 04389 |
| 5 | 4532 | GANESH NIVRUTTI DHANVE | MH-46-AZ-5604 | 8343 | 04255 | 40125 |
| 6 | 4148 | PARVESH SHARFU QURESHI | MH-46-AC-653 | MH46/896B2014 | 61206 | 25466 |
| 7 | 4253 | NARESH RAMBHAU LONDHE | MH-46-C-1846 | MH46/449B2014 | 92439 | 04406 |
| 8 | 4475 | FIROZ ASLAM SHAIKH | MH-46-AZ-5609 | 7347/PNV | 58971 | 38446 |
| 9 | 4476 | SHAHNAWAJ YUSUF AMBOLKAR | MH-46-AZ-5149 | 7348/PNV | 59164 | 38330 |
| 10 | 628 | VUAY BHIVA SONAWANE | MH-46 AZ-5146 | NO | 57900 | 37420 |
| 11 | 638 | MASZ SABBIR PATEL | NO | NO | 01242 | 39939 |
| 12 | 651 | DIPAK RAM BAHIRA | MH-46 AZ-6739 | NO | 22035 | 52669 |
| 13 | 2410 | SHARAD GANPAT DEVKAR | MH-46 AZ-3021 | NO | 89584 | 51655 |
| 14 | 4836 | SALMAN AJU MULLA | MH-46 AZ.1063 | MH46/2017/2897 | HE25629 | WE14934 |
| 15 | 4854 | YESHVANT VISHNU KAWALE | MH-46 AZ-1903 | MH467040 | HF29572 | WF18040 |
| 16 | 4841 | ARUN KANA BHAGAT | MH-46-AZ-2972 | PNL/20174128 | AZY84471 | MD2A48707 |
| 17 | 4581 | AYYAZ IBRAHIM PAVLE | MH-46-AZ-7432 | NO | L11060 | L45647 |

सही/-
सांगली- वैभव को. ऑप. क्रेडिट सो.लि., मुंबई
शाखाधिकारी
(नेरुळ शाखा)

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेतीमालमत्ता ही पोट तुकडी रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती उरण आणि ग्रामपंचायत वशेणी यांच्या हद्दीत खालीलप्रमाणे आहे :

| गावाचे नाव | सर्वे नंबर क्षेत्र (हे.आ.) | खराबा क्षेत्र (हे.आ.) | एकूण क्षेत्र (हे.आ.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|---|
| वशेणी | ६८/७/अ | ००.०१.८० | ००.१८.६० | ३.८१ |

एकूण ०-१८.६० हेक्टर-आर-चौ.मी.क्षेत्रामधून ०-९.३ हेक्टर-आर-चौ.मी. क्षेत्र हे जमिनीच्या मालकांमार्फत विक्रीयोग्य आहे.
शेतकऱ्यांची नावे :
कृष्णा धाया म्हात्रे,
वत्सलाबाई खुशाल म्हात्रे,
सुषमा प्रवीण पाटील

वरील नमूद केलेली मालमत्ता ही वंशपरंपरागत व कर्जविहीन स्वरूपात संबंधित मालकांच्या मालकी हक्कात असून त्यांनी सदरहू मालमत्ता कायमस्वरूपी विक्री करण्यास संमती दर्शविली आहे. सदरहू मालमत्ता ही निर्बंधमुक्त व बाजारहट्ट स्वरूपाची असल्याचे विद्यमान मालकांनी स्पष्ट केले आहे.

जर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेला या मालमत्तेवर कोणताही कायदेशीर हक्क, दावे, गहाण, भाडेकरार, खरेदी-विक्री, वारसाहक्क, वसीयत, बँकेचे कर्ज, बंधपत्र, दान, जामीन, टाकावा, खटला, लीज, ट्रस्ट, करार, बंधन किंवा कोणत्याही स्वरूपाचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्या अग्रवाल डेव्हलपर्स यांच्याकडे** लेखी स्वरूपात आवश्यक कागदपत्रांसह दावा सादर करावा.

ठरवलेल्या मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास, वरील मालमत्ता ही पूर्णपणे निर्बंध व वादविवादमुक्त समजली जाईल व कोणालाही कोणताही कायदेशीर हक्क किंवा हितसंबंध उरलेला नाही असे गृहित धरण्यात येईल.

तसेच, यानंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत अथवा वंशपरंपरागत दावा आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. ही बाब सर्वांच्या लक्षात घेण्यात यावी.

ही पेपर नोटीस प्रसिध्द करण्यात कोणालाही कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही किंवा कोणतीही हरकत नाही असे मी घोषित करतो व या जाहीर नोटीसीवर सही करतो.

**दिनांक : ०१/०८/२०२५**
स्थळ : उरण, रायगड
मोबा : ९८३३४२५०७५

**सही/-**
**बिनोद अग्रवाल**
**अग्रवाल डेव्हलपर्स**
खोपटा- उरण रोड, सतीश कॉम्प्लेक्स,
कोप्रोली - ४००७०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेतीमालमत्ता ही पोट तुकडी रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती उरण आणि ग्रामपंचायत पिरकोन यांच्या हद्दीत खालीलप्रमाणे आहे :

| गावाचे नाव | सर्वे नंबर क्षेत्र (हे.आ.) | खराबा क्षेत्र (हे.आ.) | एकूण क्षेत्र (हे.आ.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|---|
| पिरकोन | १८३/४ | ००.०१.५० | ००.४६.८० | ६.७६ |
| पिरकोन | २२७/५ | ००.०२.०० | ००.२७.०० | ३.३१ |

शेतकऱ्यांची नावे :
प्रेरणा दिलीपसिंह चौहान,
प्रगती दिलीपसिंह चौहान,
दिलीपसिंह रामदाससिंह चौहान

वरील नमूद केलेली मालमत्ता ही खरेदी केलेली असून व कर्जविहीन स्वरूपात संबंधित मालकांच्या मालकी हक्कात असून त्यांनी सदरहू मालमत्ता कायमस्वरूपी विक्री करण्यास संमती दर्शविली आहे. सदरहू मालमत्ता ही निर्बंधमुक्त व बाजारहट्ट स्वरूपाची असल्याचे विद्यमान मालकांनी स्पष्ट केले आहे.

जर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेला या मालमत्तेवर कोणताही कायदेशीर हक्क, दावे, गहाण, भाडेकरार, खरेदी-विक्री, वारसाहक्क, वसीयत, बँकेचे कर्ज, बंधपत्र, दान, जामीन, टाकावा, खटला, लीज, ट्रस्ट, करार, बंधन किंवा कोणत्याही स्वरूपाचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्या अग्रवाल डेव्हलपर्स यांच्याकडे** लेखी स्वरूपात आवश्यक कागदपत्रांसह दावा सादर करावा.

ठरवलेल्या मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास, वरील मालमत्ता ही पूर्णपणे निर्बंध व वादविवादमुक्त समजली जाईल व कोणालाही कोणताही कायदेशीर हक्क किंवा हितसंबंध उरलेला नाही असे गृहित धरण्यात येईल.

तसेच, यानंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत अथवा वंशपरंपरागत दावा आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. ही बाब सर्वांच्या लक्षात घेण्यात यावी.

ही पेपर नोटीस प्रसिद्ध करण्यात कोणालाही कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही किंवा कोणतीही हरकत नाही असे मी घोषित करतो व या जाहीर नोटीसीवर सही करतो.

**दिनांक : ०१/०८/२०२५**
स्थळ : उरण, रायगड
मोबा : ९८३३४२५०७५

**सही/-**
**बिनोद अग्रवाल**
**अग्रवाल डेव्हलपर्स**
खोपटा- उरण रोड, सतीश कॉम्प्लेक्स,
कोप्रोली - ४००७०२

# आदिवासी पाड्यांवरील सोयीसुविधांसाठी कार्यवाही

## नवी मुंबई महापालिकेत वन हक्क समितीची बैठक; अधिकाऱ्यांकडून आढावा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका कार्यक्षेत्रात विभागनिहाय वन हक्क समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. नियुक्त समिती सदस्यांमार्फत आदिवासी बांधवांच्या पाड्यांवर पुरविण्यात येणा-या विविध नागरी सोयी सुविधांचा आढावा घेणेकरीता समाजविकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे यांचे अध्यक्षतेखाली वन हक्क समिती सदस्यांची बैठक महापालिका मुख्यालयातील विशेष समिती कक्षात झाली.

या बैठकीस नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बेलापूर ते दिघा विभागनिहाय वन हक्क समिती अध्यक्ष, समिती सदस्य, विभाग कार्यालय स्तरावरील उप अभियंता (पाणी पुरवठा, विदयुत, स्थापत्य, मलनिःस्सारण), स्वछता अधिकारी, समाज विकास विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आदिवासी समिती सदस्यांमार्फत मागील बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत संबंधित विभागाचे उप अभियंता व स्वछता अधिकारी यांची समिती अध्यक्ष तथा उपआयुक्त यांचेसमवेत सविस्तर चर्चा झाली. यावेळी समिती अध्यक्षांमार्फत विभाग कार्यालय स्तरावरील उपअभियंता व स्वछता अधिकारी यांनी आदिवासी बांधवांच्या विविध ठिकाणच्या पाडयांवरील सदस्यांच्या वतीने मागील बैठकीत उपस्थित



केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा विभागनिहाय आढावा घेतला.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आदिवासी पाड्यांवर उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा पुरविण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न केले जात आहेत. या अनुषंगाने सामाजिक उत्तरदायित्वाच्या दृष्टीकोनातून गरीब आदिवासी बांधवांचे राहणीमान उंचावणे आवश्यक असल्याचे लक्षात घेत शासनाच्या धर्तीवर नमुंमपा कार्यक्षेत्रातील आदिवासी बांधवांना घरकुल बांधून देणे, चांगले रस्ते, दिवाबत्ती, स्वच्छतागृह, पिण्याचे स्वच्छ पाणी, परिसर स्वछता अशा प्रकारच्या मुलभूत सोयी सुविधा पुरविणे विषयी कार्यवाही करण्याचे सूचित करण्यात आले.

संबंधित विभागातील आदिवासी पाड्यांना प्रत्यक्ष भेट देऊन आदिवासी बांधवांच्या समस्या व अडचणी समजून घ्याव्यात व त्याठिकाणी आवश्यक असलेल्या नागरी सोयी सुविधांची पाहणी, सर्वेक्षण करून सदर समस्यांचे तातडीने निराकरण करणेच्या दृष्टीने कार्यवाही करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल सादर करावा असे निर्देश वन हक्क समिती अध्यक्ष तथा उपआयुक्त, समाजविकास विभाग यांनी उप अभियंता (पाणी पुरवठा, विद्युत, स्थापत्य, मलनिःस्सारण), स्वछता अधिकारी, समाज विकास विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना दिले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आरोग्यदायी आहार विषयावर सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान विद्यालयात गुरुवार दिनांक ३१ जुलै सकाळी ११ वाजता अपोलो हॉस्पिटल खारघर व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्यदायी जीवनासाठी आरोग्यदायी आहार या विषयावर माहितीपूर्ण सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये संतुलित आहाराचे महत्त्व, आहाराचे आरोग्यावर होणारे परिणाम आणि निरोगी जीवनशैलीची गरज याविषयी जनजागृती करणे हे होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या हस्ते करण्यात आले तसेच त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थी जीवनातील आहाराचे महत्त्व अधोरेखित केले आणि आरोग्यदायी जीवनासाठी योग्य आहार आणि नियमित व्यायामाची आवश्यकता सांगितली. या सत्रासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्योती राव आहारतज्ज्ञ उपस्थित होत्या व त्यांनी संतुलित आहार, जीवनशैलीतील बदल, जंक फूडचे दुष्परिणाम आणि योग्य वेळेवर अन्न सेवनाचे फायदे यावर सखोल मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारले आणि आहारविषयक शंका उपस्थित करून समाधान घेतले. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रथमेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी ठरला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाने अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी विद्यार्थ्यांनी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# वीर वाजेकर कॉलेजमध्ये गुंतवणूक जागृती कार्यशाळा

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

वीर वाजेकर ए.एस.सी. कॉलेज, फुंडे येथील वाणिज्य विभाग व बीएमएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कृष्णा फाउंडेशनच्या सहकार्याने गुंतवणूक जागृती कार्यशाळा व वाणिज्य मंडळाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. प्रांजल भोईर यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद एन. ठक्कर यांनी अध्यक्षीय भाषणात गुंतवणुकीचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे पहिले सत्र एनएसई (राष्ट्रीय शेअर बाजार) या विषयावर होते. या सत्रात सेबी SMART प्रशिक्षक डॉ. प्रियांका राणी यांनी



विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील गुंतवणुकीची माहिती दिली. त्यांनी सेबीच्या नियमावली, गुंतवणुकीची सुरक्षा आणि गुंतवणूकदारांच्या अधिकारांबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. या सत्राच्या शेवटी प्रा. भूषण ठाकूर यांनी आभार प्रदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लि. विषयावर विनायक उप्पल यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी डिमॅट खाते, म्युच्युअल फंड व डिजिटल गुंतवणुकीचे फायदे यावर मार्गदर्शन केले. यानंतर प्रा. तन्वी कोळी यांनी आभार प्रदर्शन केले.`.

या कार्यशाळेच्या आयोजनात प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद एन. ठक्कर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. प्रांजल भोईर, सह-समन्वयक प्रा. भूषण ठाकूर व सह-को-ऑर्डिनेटर प्रा. प्रियांका ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता वाढीस लागेल आणि गुंतवणुकीबाबतची माहिती मिळेल.

# नवी मुंबईत स्वच्छतादूतांची आरोग्य तपासणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सर्व ऋतुंमध्ये शहर स्वच्छतेची काळजी घेणाऱ्या स्वच्छतामित्र, स्वच्छतासखी व सफाईमित्रांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने आज सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियानांतर्गत विशेष आरोग्य तपासणी शिबीरे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी राबविण्यात आली.

महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व स्मिता काळे आणि



परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ उपायुक्त संजय शिंदे यांच्या निरीक्षणाखाली, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या माध्यमातून प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांचे वैद्यकिय अधिकारी यांच्या सहयोगाने आठही विभागांचे सहाय्यक आयुक्त व स्वच्छता अधिकारी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह हा उपक्रम यशस्वी केला.

यामध्ये बेलापूर विभागात माता बाल रुग्णालय, बेलापूर गाव, वाशी विभागात नागरी आरोग्य केंद्र वाशी से.१, घणसोली विभागात नागरी आरोग्य केंद्र घणसोली, ऐरोली विभागात नागरी आरोग्य केंद्र से.२ ऐरोली व दिघा विभागात नागरी आरोग्य केंद्र दिघा आणि नागरी आरोग्य केंद्र याठिकाणी तपासणी शिबीरे आयोजित करुन स्वच्छतामित्र,स्वच्छतासखी व सफाईमित्रांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये पुढील उपचारांची गरज असलेल्या स्वच्छताकर्मींना पुढील उपचारासाठी महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालयामध्ये संदर्भीत करण्यात आले.

# ‘रोटरी’तर्फे विद्यार्थ्यांचा सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आयोजित १० वी आणि १२ वीच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी आणि मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये पाताळगंगा रसायनी परिसरातील एकूण २० माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या एकूण ३६ गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा कार्यक्रम पिल्लईज स्कूल,मोहोपाडा रसायनी येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून रिलायन्स फाउंडेशन स्कूल, लोधिवलीचे प्राचार्य आतिश क्षीरसागर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विजय पाटील होते. याप्रसंगी विद्यार्थी, पालक आणि शिक्षक, मुख्याध्यापक यांना समयोचित मार्गदर्शन करून आगामी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. माजी अध्यक्ष गणेश काळे यांनी गणेशस्तवन सादर केले. माजी अध्यक्ष सचिन थोरात यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला.

या वेळी अध्यक्ष विजय पाटील सचिव गणेश वर्तक, देवेंद्र महिंद्रकर, माजी अध्यक्ष नागेश कदम, माजी अध्यक्ष बाळकृष्ण होनावळे, शशिकांत शानबाग आदी मान्यवर उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह प्रदान केली


# महसूल दिनानिमित्त पनवेलमध्ये विशेष सप्ताहाचे आयोजन




**पनवेल : वार्ताहर**

एक ऑगस्ट हा महसूल दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने पनवेलच्या महसूल विभागाकडून एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट दरम्यान राज्यभरात विशेष सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहादरम्यान पनवेल महसूल विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात महसूल संवर्गातील अधिकारी व कर्मचारी वर्ग, तसेच सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग असेल. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी एक विशेष सत्कार समारंभही आयोजित केला जाणार आहे. हा सोहळा उद्या नवीन शासकीय इमारत पनवेल येथे सकाळी अकरा वाजता होणार असून प्रसिद्ध इतिहासकार प्रशांत देशमुख प्रमुख पाहुणे असणार आहे अशी माहिती प्रांताधिकारी पवन चांडक यांनी दिली.




## आला श्रावण श्रावण

शाल काळी पांघरून
टाके अवस पाऊल
घर उजळे दीपांनी
देई श्रावण चाहूल ।।१।।

आला श्रावण श्रावण
व्रत वैकल्यांचा मास
भासे प्रसन्न निसर्ग
मंद फुलांचा सुवास ।।२।।

श्रावणात लपंडाव
चाले उन पावसाचा
कधी निरभ्र सुंदर
क्षणी कृष्ण आभाळाचा ।।३।।

सण पंचमीचा आला
करू नागांचे पूजन
बहरली रम्य सृष्टी
गोड पक्षांचे कूजन ।।४।।

श्रावणाच्या सोमवारी
जाऊ मंदिरी शिवाच्या
बेलपत्र वाहताच
पूर्ण आकांक्षा मनाच्या ।।५।।

अष्टमीला दहीहंडी
जन्म दिवस कृष्णाचा
बाळगोपाळांच्या सवे
घेऊ आनंद काल्याचा ।।६।।

होती श्रावणात नित्य
नवे नवेच सोहाळे
जणू गर्भार धरणी
तिचे पुरवू डोहाळे ।।७।।



-संपदा राजेश देशपांडे, पनवेल







राम प्रहर
शनिवार, २ ऑगस्ट २०२५



# विधानसभेत विजयाचा चौकार मारणारे नेते

एखादी अशक्य गोष्ट असेल तर ती शक्य करून दाखविणाऱ्या व्यक्तीला 'किमयागार' म्हणून संबोधले जाते. त्याप्रमाणे पनवेल विधानसभा मतदारसंघातून तब्बल चारवेळा आमदार म्हणून निवडून येणे ही राजकीय क्षेत्रात अशक्य वाटणारी गोष्ट जनतेच्या आशीर्वादाने शक्य करून दाखविणारे आमदार प्रशांत ठाकूर हे पनवेल विधानसभेच्या राजकीय क्षितिजावरील खरे मानकरी ठरले आहेत.

२००९ सालच्या विधानसभेपासून ते २०१४ त्यानंतर २०१९ आणि आता गेल्या वर्षी २०२४ची अशी सलग चार वेळा विधानसभेची निवडणूक जिंकून त्यांनी विजयी चौकार मारला आहे. मंत्रीपद सांभाळण्याची क्षमता त्यांच्यात आहे. यावेळी ते राज्याचे मंत्री होतील अशी आशा रायगडातील जनतेला वाटत होती. मंत्रीपद मिळाले नाही म्हणून ते काही नाराज नाहीत. जनतेची कामे कशी लवकर होतील याकडे त्यांचा कटाक्ष असतो. त्यांच्या आमदारकीच्या आजपर्यंतच्या कारकिर्दीत त्यांनी विधानसभेत अनेक तारांकित प्रश्न उपस्थित केले आहेत तसेच अनेक विकासकामांसाठी प्रत्येकवेळी भरीव निधी उपलब्ध करून घेऊन आपल्या मतदारसंघाचा विकास केला आहे.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा, मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी या भागात फिरून पक्ष बळकटीसाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी सिडकोचे अध्यक्षपदही सांभाळले. जनकल्याणाचा वसा आणि लोकसेवेचे व्रत घेऊन लोकहिताची धुरा खांद्यावर घेतल्यापासून ते आजपर्यंत आमदारांची राजकीय वाटचाल वाखाणण्याजोगी आहे. नगरसेवक, नगराध्यक्ष ते आमदार या प्रवासात त्यांची यशस्वी घोडदौड पहिल्यास 'मूर्ती लहान, पण किर्ती महान' असेच म्हणावे लागेल.

आमदार प्रशांत ठाकूर यांचा स्वभाव हा सर्वसामान्य कार्यकर्त्यासारखा आहे. आपण आमदार किंवा मोठे नेते आहोत ही भावना त्यांच्या मनाला कधी शिवली नाही, किंबहुना सर्वसामान्याच्या सुखदुःखात नेहमीच धावून जाणारे असे हे व्यक्तिमत्व आहे. जनतेमध्ये ते मिसळून जातात. त्यामुळे जनतेला आपलेसे वाटतात. आरएसएस, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, संस्कार भारती, वनवासी कल्याण आश्रम, सिंधुदुर्ग रहिवाशी संघ, ज्येष्ठ नागरिक संघ यासारख्या अनेक समाजसेवी संघटनांच्या कार्यातही आमदार प्रशांत ठाकूर यांचे नित्य योगदान असते. आपल्याकडील पैसे खर्च करून समाजपयोगी कामे करणारे मोजके असतात. त्यातीलच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर हे सतत आणि अखंडपणे समाजाची सेवा करण्याचे काम करीत आहेत.

रोजगार शोधणाऱ्यांना दरवर्षी भारतीय जनता पक्षातर्फे महारोजगार मेळावा भरवला जातो. यामध्ये अनेकांना रोजगाराची संधी प्राप्त होते. या वर्षी हा मेळावा २ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यामुळे खऱ्या अर्थाने या दोघांनी सामाजिक वसा जपला आहे.

आमदार प्रशांत ठाकूर हे आपले पिताश्री लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पावलावर पाऊल ठेवत आपला उद्योग-व्यवसाय सांभाळून राजकारणात आले आणि त्यांच्याप्रमाणे एका झटक्यात यश मिळवून गेले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ज्याप्रमाणे पाठीशी कोणतीही राजकीय पाश्वभूमी नसताना प्रथमच लोकसभा निवडणूक लढविली आणि ते विजयी झाले, त्याप्रमाणेच आमदार प्रशांत ठाकूर यांनीही प्रथमच २००९ साली विधानसभा निवडणूक लढविली आणि पहिल्या झटक्यातच विजयश्री खेचून आणली.

'प्रशांतला माझा मुलगा म्हणून लहानाचा मोठा केला. त्याला चांगले शिक्षण दिले. त्याच्यावर चांगले संस्कार केले. एक तळमळीचा, सचोटीचा आणि प्रशासन कुशल नेता म्हणून मी त्याला जनसेवेसाठी आता येथील जनता जनार्दनाच्या हाती सुपूर्द करीत आहे,' असे भावपूर्ण उद्‌गार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पनवेल विधानसभा मतदारसंघातील आमदार म्हणून प्रशांत ठाकूर यांच्या पहिल्या विजयाबद्दल बोलताना काढले होते. लोकनेते रामशेठ ठाकूर हे मूळचे हाडाचे शिक्षक असल्यामुळे त्यांनी मुलांना चांगल्या प्रकारे तयार केले. स्वतः श्रम केले, अतिशय खडतर परिस्थितीतून शिक्षण घेऊन ते मोठे झाले. व्यवसायात जम बसल्यावर त्यांना चांगले दिवस दिसले, परंतु येथील गोरगरीबांना ते कधी विसरले नाहीत. त्यांनी निस्वार्थ भावनेने गरजू जनतेला वेळोवेळी केलेल्या मदतीची प्रचिती म्हणून जनता जनार्दनाने दिलेल्या पाठिंब्याने ते खासदार झाले आणि त्यांनी स्वतःला जनसेवेला वाहून घेतले. तेव्हा त्यांचा व्यवसाय प्रशांत ठाकूर यांनी समर्थपणे सांभाळला आणि एक यशस्वी उद्योजक म्हणून आपले कर्तृत्व दाखवून दिले.

आमदार प्रशांत ठाकूर यांना लहानपणापासून समाजकार्याची आवड असल्यामुळे तरुणपणीच त्यांनी व्यवसाय सांभाळून समाजकार्यही सुरू ठेवले. पनवेलचे नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्यावर व्यवसायाची धुरा आपले लहान भाऊ परेश ठाकूर यांच्यावर सोपवून त्यांनी स्वतःला जनसेवेला वाहून घेतले. नगराध्यक्ष असताना त्यांनी प्रशासन कौशल्य



आत्मसात केले. आपल्या अडीच वर्षांच्या यशस्वी कारकिर्दीत पनवेल शहरातील नागरिकांच्या केलेल्या सेवेची पोचपावती म्हणून पनवेल शहरासह तालुक्यातील मतदारांनी आपल्या भरघोस मतांनी पनवेलचा आमदार म्हणून त्यांना पहिल्यांदा निवडून आणले.

आमदार प्रशांत ठाकूर हे जरी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सुपुत्र असले तरी आपल्या वडिलांच्या राजकीय सत्तास्थानाचा त्यांनी कधीही गैरफायदा घेतला नाही. उलट आपल्या वडिलांच्या आशीवादाने त्यांच्या पावलावर पाऊल टाकून त्यांनी स्वकर्तृत्वावर आपली राजकीय कारकीर्द घडविली. त्यांनी आमदार म्हणून येथील नागरिकांसाठी आपले जीवन झोकून देऊन कार्य केले व करीत आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आजपर्यंत अनेक रंजल्या गांजलेल्यांच्या दुःखावर फुंकर घातली आहे. अडी-अडचणीत असलेल्या अनेकांना मदतीचा हात पुढे केला आहे आणि त्याचबरोबर आपल्या आमदारकीच्या कारकिर्दीत अनेक विकासाची कामे करून पनवेल तालुका सुजलाम् सुफलाम् करण्याचा चंग त्यांनी बांधला आहे. त्यांच्या या राजकीय कारकिर्दीचा चढता आलेख पाहता भविष्यात राज्याच्या मंत्रिपदाची माळ त्यांच्या गळ्यात पडावी अशी येथील जनतेची इच्छा आहे. तसे झाले, तर मग पनवेलचे नाव महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर उमटविण्यास ते नक्कीच यशस्वी होतील अशा शुभेच्छा त्यांच्या वाढदिवसानिमित्त देत आहे.

**-दिलीप रेडकर,**
**ज्येष्ठ लेखक, मुक्त पत्रकार**



# दमदार आमदार

दादा मुलीच्या लग्नाला या, दादा आई आजारी आहे, दादा मुलीचं ॲडमिशन करायचेय, मुलाला परदेशात शिकायला पाठवायचेय... अशा विविध कामांसाठी हक्काने पनवेलकर आपल्या हक्काच्या माणसाकडे, लोकप्रतिनिधीकडे साथ घालायला सकाळी सकाळीच कार्यालयात जातात. आपल्याकडे आलेल्या प्रत्येक व्यक्तीची व्यथा आपुलकीने विचारपूस करून प्रेमळ स्वभावाने जाणून घेऊन त्याची सोडवणूक करण्याची किमया पनवेलचे कार्यसम्राट, दमदार, कामदार, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर हे गेली अनेक वर्ष करीत आले आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी जपलेल्या सामाजिक बांधिलकीमुळेच त्यांनी पनवेलकरांच्या हृदयात एक अढळ स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे सामान्यांचे, पीडित लोकांचे, अडलेल्या-नडलेल्यांचे, गरजवंतांचे आणि बहुजनांचे आधार बनलेले आमदार प्रशांत ठाकूर यांचा अभीष्टचिंतन सोहळाही समाजोपयोगी असतो.

लोकप्रतिनिधी म्हटले की लोकांशी थेट संपर्क हा आलाच. नित्यनेमाने जनतेशी संवाद साधणारे आमदार प्रशांत ठाकूर हे पनवेलकरांना चांगले ज्ञात आहेत. आपल्या व्यस्त कामातून ते नियमितपणे आपल्या कार्यालयात दररोज सकाळी पनवेलकरांचे, पनवेलमधील सर्वसामान्यांचे प्रश्न, अडी-अडचणी प्रत्यक्ष भेटून, समजावून घेऊन त्यावर अंमलबजावणी करीत आपल्याकडे आलेल्या नागरिकाला दिलासा देण्याचे काम करीत आले आहेत. व्यक्तिगत कामांसोबतच सार्वजनिक, सांस्कृतिक, भौगोलिक, राजकीय, कार्यक्रमांचा अन् कामांचाही धडाका तितकाच त्यांचा मोठा आहे. पनवेलच्या विकास हाच एकच त्यांचा ध्यास हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिला आहे.

एक नगरसेवक, नगराध्यक्ष ते कार्यसम्राट आमदार अशी राजकीय उन्नती साधत पनवेलकरांच्या सेवेशी कायम ते बांधील झाले आहेत. नगर परिषद ते पनवेल महापालिकेच्या माध्यमातून पनवेलचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल यासाठी ते आपली कल्पकता वापरून पनवेलचा सर्वांगीण विकास करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. पनवेल विधानसभा क्षेत्रातील नागरिकांना उत्तम, सर्वोत्तम सुविधा कशा चांगल्या देता येतील यासाठी ते शासन स्तरावर नेहमीच कार्यरत असतात. मग तो पनवेलच्या ज्वलंत पाण्याचा प्रश्न असो, झपाट्याने वाढलेल्या नागरीकरणाचा असो, अथवा रस्ते, मलनिसरण वाहिन्या, उद्याने, सांस्कृतिक रेलचल ठरणारे नाट्यगृह असो पनवेलकरांशी निगडित असलेल्या सोयीसुविधा देण्यासाठी ते पनवेलकरांसोबत समरस झालेले आहेत. पनवेलमधील सिडको वसाहतींमधील जटील प्रश्नांची सोडवणूकही त्यांनी तितक्याच खुबीने करून आपल्या मतदारांना दिलासा देण्याचे काम ते करत आले आहेत.

पनवेलची शैक्षणिक भरारी होत राहो यासाठीही ते त्यांच्या असलेल्या शिक्षण संस्थेमधून आपल्या कार्याचा ठसा उमटवत आले आहेत. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून पनवेलकरांना नेहमी आर्थिक मदत देऊन दिलासा देण्याचे काम ते अनेक वर्ष करीत आले आहेत. कोणाचीही वैद्यकीय शस्त्रक्रिया असो किंवा वैद्यकीय उपचार असो किंवा गरिबांच्या शिक्षणाचा खर्च असो, परदेशात एखादे सामान्याचे मुलं जाणार असेल, तर त्याला आर्थिक मदतीचा हातभार हा त्यांनी वेळोवेळी दिलेला आहे.

कला, क्रीडा, सांस्कृतिक, विविध खेळांचे सामने असो, सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचाल असो, मॅरेथॉन स्पर्धा अशा विविध समाजपयोगी उपक्रमांमुळे बहुजनांचा आधार कार्यसम्राट, कामदार, दमदार, आमदार प्रशांतदादा ठाकूर हे ठरले आहेत. पनवेल आता शैक्षणिक तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळाचे, कोकण रेल्वेचे असणारे पनवेल रेल्वेस्थानकाचे मोठे प्रवासी हब बनत चालले आहे.



वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पनवेलला तितक्याच तोलामोलाच्या नागरी सुविधा कशा उपलब्ध होतील यासाठी ते मंत्रिमंडळातील आपल्या सहकारी आमदारांसोबत भेटीगाठी घेऊन पनवेलच्या विकासात भर घालत आहेत. नुकताच त्यांनी पनवेलला भेडसावणाऱ्या पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यात ते यशस्वी ठरले आहेत. त्याचे श्रेय निश्चितच कार्यसम्राट आणि दमदार आमदार प्रशांतदादा ठाकूर यांना द्यावे लागेल. विकासाचा एक पक्का वादा म्हणजेच प्रशांतदादा असे पनवेलमध्ये सहजरित्या बोलले जाते.

पनवेल महापालिकेच्या वतीने हजारो कोटींची विकासाची कामे सध्या पनवेलकरांच्या सेवेशी सुरू आहेत. याचेही श्रेय आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले तर वावगे ठरणार नाही. पनवेल हे महाराष्ट्राच्या विविध भागात जाणारे एक प्रवेशद्वार आहे. पनवेलला तसा ऐतिहासिक वारसाही आहे. पनवेलची जडणघडण ही पनवेलकरांनी याची देही याची डोळा पाहिलेली आहे. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय कार्याचा वारसा आणि त्याचे बाळकडू हे आमदार प्रशांत ठाकूर यांना त्यांचे पिताश्री लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून मिळालेले आहे अन् तसा वारसा त्यांनी अवगतही केलेला आहे. घरात राजकीय पार्श्वभूमी असली तरी स्वयंप्रकाशित होणे हे तितके सोपे नसते. आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी घेतलेली भरारी ही निश्चितच भावी पिढीला प्रेरणादायी अशीच ठरणार आहे. त्यांनी पनवेलच्या विकासाचे पाहिलेले स्वप्न ते प्रत्यक्षात आपल्या कृतीतून उतरवित आहेत. त्यासाठी आपली राजकीय कल्पकता, डावपेच हे निश्चितच वापरून पनवेलच्या वाट्याला जास्तीत जास्त शासन निधी कसा मिळेल यासाठी त्यांचा नेहमीच प्रयत्न सुरू असतो आणि त्यात ते यशही मिळवून घेतात हे सर्वांनीच पाहिले आहे.

आमदारकीचा चौकार प्रशांत ठाकूर यांनी मारलेला आहे. त्यांनी पनवेलकरांच्या हृदयात एक अढळ स्थान निर्माण केलेले आहे आणि ते स्थान त्यांनी त्यांच्या विकासात्मक भूमिकेमुळे, पनवेलच्या सर्वांगीण विकास व्हावा हा एकमेव घेतलेल्या ध्यासातून निर्माण केले आहे. त्यामुळेच त्यांच्या राजकीय प्रवासात आमदारकीच्या चौकाराची विजयश्री आलेली आहे. अशा कार्यसम्राट आमदारांचा वाढदिवस ५ ऑगस्ट रोजी आहे. या वाढदिवसानिमित्त आगामी काळात त्यांची राजकीय उत्तरोत्तर प्रगती व्हावी, पनवेल विधानसभा क्षेत्राला मंत्रिमंडळाचा सुवर्ण मुकुटही प्राप्त व्हावा यासाठी पनवेलकरांच्या वतीने पालीच्या श्री बल्लाळेश्वरचरणी विनम्र प्रार्थना. पुनश्च विकासाची भगीरथ गंगा पनवेलमध्ये प्रत्यक्षात उतरवणारे अन् विकासाचा पक्का वादा, सर्वांचा लाडका एकच वादा पनवेलकरांचे लाडके आमदार प्रशांतदादा यांना मंगलमय हार्दिक शुभेच्छा!


**-दीपक घोसाळकर,**
**पत्रकार, कळंबोली**

# असामान्य व्यक्तिमत्व

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांनी अविरत प्रयत्न, कष्ट व ध्यासाने यशोशिखर गाठले आणि जनतेमध्ये आदरभाव निर्माण केला. आज हाच वारसा त्यांचे दोन्ही चिरंजीव आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांना मिळाल्याने तेही त्याच वाटेवर वाटचाल करताना आढळतात. सलग चार टर्म आमदार असलेले प्रशांत ठाकूर यांनी पनवेलच्या विकासाचा ध्यास घेतला आणि जनसेवा हीच ईश्वरसेवा मानून ते कार्यरत आहेत.

आमदार प्रशांत ठाकूरसाहेबांचे एका समारंभातील भाषण मला प्रेरित करून गेले, ते म्हणजे वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथील. त्यांचे भाषेचे ज्ञान, विषयाचा अभ्यास, भाषेवरील प्रभूत्व व ते मांडण्याची शैली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेळेचे नियोजन व भान मला खूप काही शिकवून गेले.

एकदा पनवेल महापालिकेच्या वतीने १८ सप्टेंबर २०२४ रोजी स्वच्छता अभियानात आम्ही सहभागी झालो होतो, त्या वेळचा आमदार प्रशांत ठाकूरसाहेबांच्या बरोबर झालेला एक किस्सा आठवला. स्वच्छता मोहीम सुरू झाल्यावर काही क्षणात पत्रकार वगैरे मंडळी मुलाखतीसाठी त्यांना आग्रह करू लागले, पण त्यांनी खुणेनेच थांबा असे सांगितले. मी व इतर सर्व आश्चर्यचकित झालो. मग थोड्या वेळानंतर त्यांनी खुलासा केला की, आपण व मी जो परिसर स्वच्छता अभियानात निवडला तो परिसर संपूर्ण स्वच्छ झाल्याखेरीज काही बोलणे योग्य वाटले नाही म्हणून नाही म्हटले. नंतर परिसर स्वच्छ झाल्यावर योग्य वेळी त्यांनी मुलाखतीसाठी वेळ दिला. नवलाची गोष्ट आवर्जून सांगावी अशी की, दुसऱ्या दिवशी एका वृत्तपत्रात माझादेखील फोटो त्यांच्याबरोबर पाहून मला आनंद झाला. अगदी व्यक्तिगत पातळीवर उदाहरण मांडतो ते म्हणजे पनवेलच्या अमरधाम स्मशानभूमी येथे माझी आत्या गेल्यानंतर सर्व क्रियाकर्म करावयास सुरुवात झाली होती. तेवढ्यात आमदार प्रशांत ठाकूर हेही तिथे आले होते. त्यांच्या आप्त, मित्र परिवार यापैकी कोणाचा तरी अपघाती मृत्यू झाला होता. मी परिस्थिती ओळखून वाट पाहावी असेच ठरविले, कारण तेही तेथे होते व सामान्य माणसापेक्षा सर्वच बाबतीत प्रभावी असणाऱ्या त्यांचे दुःख व वेळ अत्यंतिक मोलाचा म्हणून..., पण त्याही प्रसंगी त्यांनी आमचे सांत्वन केले व प्रथम आम्हास गॅसवाहिनीवर आमच्या नातेवाईकाचे क्रियाकर्म करण्यास सांगून मनाचा मोठेपणा दाखवला. तो प्रसंग आजही माझ्या मनात घर करून आहे.



आज अशा असामान्य व्यक्तिमत्व असूनही सामान्यांसारख्या वागणाऱ्या व्यक्तीच्या आरोग्यसंपन्न जीवन व दीर्घायुष्याची कामना करीत आहे.

*एका वाढदिवसाची गोष्ट आहे*
*मी आज सांगणार।*
*आमचा आपला प्रशांत आता*
*पन्नाशी पार करणार।।१।।*
*रामशेठ शकुंतला जन्मदाते*
*शुभहस्ते औक्षण होणार।*
*आनंद, समाधान अन् दीर्घायुष्य*
*आशीर्वाद मिळणार ।।२।।*
*तो आमचा कधीच झाला*
*अंतर कधीचं संपलं*
*जनसेवा हीच ईश्वरसेवा*
*सर्वार्थाने आयुष्य वेचलं।।३।।*
*एकच आस, एकच ध्यास असेल*
*आमचा उद्यासाठी।*
*उज्वल भवितव्य, यशस्वी*
*कारकिर्द अभिनंदन*
*तुज भविष्यासाठी।।४।।*

**-संजीव काळकर,**
**लेखक, पनवेल**

# संयमी नेतृत्व



पनवेल विधानसभा मतदारसंघात तब्बल चार वेळा निवडून आलेले आमदार प्रशांतदादा ठाकूर अत्यंत संयमी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. सलग चार वेळा ते आमदार म्हणून निवडून आले आहेत.

प्रशांतदादा भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगडचे जिल्हाध्यक्ष होते, त्या वेळी ते नेहमीच विविध कार्यक्रमात आवर्जून हजेरी लावत असत. कर्जत तालुक्यातही भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते गावोगावी असावेत, म्हणून त्यांचे सातत्याने प्रयत्न होते. अगदी छोटा-मोठा कार्यक्रम असो प्रशांतदादा उपस्थित राहायचे. पक्षामध्ये गटबाजी नसावी असे त्यांचे मत होते. त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन पक्षवाढीसाठी प्रयत्न केले. आजही ते कर्जतसाठी वेळ देतात. कर्जत-पनवेल लोकलसेवा सुरू व्हावी यासाठी ते नेहमीच आग्रही राहिले आहेत. भाजप नेते सुरेश प्रभू केंद्रीय रेल्वेमंत्री असताना कर्जतच्या पदाधिकाऱ्यांना, सामाजिक कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन त्यांची भेट घेऊन ही सेवा लवकरात लवकर सुरू करावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली होती. ती मागणी मान्य होऊन कर्जत-पनवेल रेल्वेमार्गाचे साठ-सत्तर टक्के काम पूर्ण झाले असून येत्या वर्षभरात ही सेवा सुरू होईल.

पत्रकारांच्या बाबतीतसुद्धा प्रशांतदादा नेहमीच आदर व्यक्त करतात. माथेरानचे पत्रकार संतोष पवार यांचा कोरोनामुळे मृत्यू झाला. त्या वेळी त्यांनी पवार यांच्या कुटुंबियांना आर्थिक सहकार्य केले होते. रायगड प्रेस क्लब आणि कर्जत प्रेस क्लबच्या वतीने स्व. संतोष पवार पत्रकारिता पुरस्कार सुरू केला. त्यावेळीही त्यांनी सहकार्य केले होते तसेच पुरस्कार सोहळ्याला आवर्जून उपस्थित राहून पत्रकारांच्या उपक्रमाचे कौतुक ते करीत आले आहेत. प्रशांतदादा कोणत्याही समारंभात कितीही गडबडीत असले तरी पत्रकारांना हसतमुख सामोरे जाण्याची त्यांची सवय सर्वांनाच भावते.

प्रशांतदादा यांनी सिडकोचे अध्यक्षपद यशस्वीपणे सांभाळले होते. मागील निवडणुकीनंतर त्यांना नक्की मंत्रिपद मिळेल अशी रायगडकरांची अपेक्षा होती, मात्र त्या वेळी जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती बदलल्यामुळे त्यांचे मंत्रीपद हुकले. तरीही त्यांनी कधी नाराजी व्यक्त केली नाही. अतिशय संयमी आणि मृदुभाषी अशी त्यांची ओळख आहे. कायम जमिनीवर पाय असणारा राजकारणी म्हणून त्यांच्याकडे पहिले जाते. प्रशांतदादांनी कधीच कुणाचा हिरमोड केला नाही. वडील माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांचे कार्य सुरू आहे. वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड आयुरारोग्य लाभो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना!


**-विजय मांडे,**
**ज्येष्ठ पत्रकार, कर्जत**

# खालिद जामिल भारतीय फुटबॉल संघाचे नवे मुख्य प्रशिक्षक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय स्तरावर संघर्ष करणाऱ्या भारतीय पुरुष फुटबॉल संघाला नवी दिशा देण्यासाठी अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ईस्ट बंगाल आणि मोहन बागान यांसारख्या दिग्गज क्लबचे माजी व्यवस्थापक आणि सध्या जमशेदपूर एफसीचे प्रशिक्षक असलेल्या खालिद जामिल यांची भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे तब्बल १३ वर्षांनंतर भारतीय फुटबॉल संघाला एक भारतीय मुख्य प्रशिक्षक मिळाला आहे.

एआयएफएफने एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, कार्यकारी समितीने तांत्रिक समितीच्या उपस्थितीत, खालिद जामिल यांची वरिष्ठ भारतीय पुरुष राष्ट्रीय संघाच्या नवीन मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे. जामिल यांची निवड भारताचे माजी प्रशिक्षक स्टीफन कॉन्स्टंटाईन यांना मागे टाकत झाली आहे. जामिल हे तब्बल १३ वर्षांनंतर भारतीय संघाचे प्रशिक्षकपद भूषवणारे पहिले भारतीय ठरले आहेत. याआधी साविओ मडेरा यांनी ऑक्टोबर



२०११ ते मार्च २०१२ या कालावधीत भारतीय संघाचे प्रशिक्षकपद सांभाळले होते. जामिल नेमके कधीपासून संघाची सूत्रे हाती घेतील हे एआयएफएफने अद्याप स्पष्ट केलेले नाही.

खालिद जामिल यांच्यावर संघाची धुरा सांभाळताच तत्काळ प्रभाव पाडण्याची मोठी जबाबदारी असेल. भारतीय संघाला सप्टेंबरमध्ये फिफा आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या विंडोमध्ये खेळावे लागणार आहे. त्यानंतर ९ आणि १४ ऑक्टोबर रोजी सिंगापूरविरुद्ध एएफसी आशियाई चषक पात्रता फेरीचे महत्त्वपूर्ण सामने खेळायचे आहेत. त्यामुळे जामिल यांच्या रणनीती आणि मार्गदर्शनाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

खालिद जामिल यांचा जन्म २१ एप्रिल १९७७ रोजी कुवेतमध्ये झाला. त्यांचे आई-वडील भारतीय आहेत. भारताचे माजी मिडफिल्डर असलेले जामिल आता एएफसी प्रो लायसन्सधारक प्रशिक्षक आहेत. त्यांनी महिंद्रा युनायटेड, एअर इंडिया आणि मुंबई एफसी यांसारख्या क्लबसाठी व्यावसायिक फुटबॉल खेळले आहे. १९९८ ते २००६ या काळात त्यांनी भारतीय संघाचे प्रतिनिधित्वही केले. दुखापतीमुळे त्यांना लवकर निवृत्ती घ्यावी लागली, पण त्यानंतर त्यांनी यशस्वीपणे प्रशिक्षकी कारकिर्दीत प्रवेश केला. त्यांच्या नियुक्तीमुळे भारतीय फुटबॉलमध्ये एका नव्या पर्वाची सुरुवात होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.












## मल्हार कारंजकरचे बुद्धीबळ स्पर्धेत यश

**माणगाव : बातमीदार**



माणगावच्या मल्हार प्रशांत कारंजकर याने तालुक्यातील गोरेगाव येथे झालेल्या रायगड जिल्हा बुद्धीबळ निवड चाचणी स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत जिल्ह्यातून तब्बल १०७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. मल्हार कारंजकरने जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविल्याने त्याची निवड विभागीय स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. अनेकांनी त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com